cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र वर्ष - ४ अंक-१२३ शनिवार दि.२४ ऑगस्ट २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने- ६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

### मंकीपॉक्सचे संकट घोंघावतेय..

कोरोना जगाला उद्ध्वस्त करून गेला, होत्याचे नव्हते झाले. जगातील अनेक देशांचे अर्थकारण बिघडविले. जगाने एकत्रितपणे कोरोनाविरोधात लढा देत कोरोनावर विजय मिळविला. कोरोनाच्या धक्क्यातून जग आताच कुठे सावरायला लागले असतानाच आता मंकीपॉक्सने पाय पसरले. कोरोनासारखेच मंकीपॉक्सच्या व्याप्तीची दखल जागतिक पातळीवर घेण्यात आली असून जगावर लॉकडाऊनचे संकट पुन्हा निर्माण होतेय की काय याची कुजबुज वैद्यकीय विश्वात सुरू झाली आहे.

### मुख्यमंत्री आशयाचे थोरात, पटोले यांचे बॅनर

नाशिक- नाशिकच्या मेळाव्यात आमचे मुख्यमंत्री बाळासाहेब थोरात आणि नाना पटोले अशा आशयाचे बॅनर घेऊन काँग्रेसच्या मेळाव्यात कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. सध्या महाविकास आघाडीत मुख्यमंत्री पदावरुन बरेच राजकारण सुरु आहे. नाना पटोले भाषणाला उभे राहिल्यानंतर कार्यकर्त्यांकडून आमचे मुख्यमंत्री बाळासाहेब थोरात आणि नाना पटोले असे बॅनर दाखवण्यात आले.

# आरक्षण लढ्यानंतर आता मिशन शेतकरी कर्जमाफी

## मनोज जरांगेंची मोठी घोषणा; लवकरच आंदोलनाची दिशा ठरवणार

**जालना । प्रतिनिधी**

**मराठा समाजाच्या आरक्षणासाठी लढा देणारे उपोषकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी आता शेतकऱ्यांसाठी लढा उभारणार असल्याची घोषणा केली आहे. आरक्षण लढ्यानंतर आता मिशन शेतकरी कर्जमाफी जरांगे यांनी हाती घेतली आहे. लवकरच आंदोलनाची दिशा ठरवणार असल्याचे त्यांनी संकेत दिले आहेत.**

राज्य सरकारने मराठा समाजाला सगेसोयरे आणि कुणबी प्रमाणपत्र देण्याचे आश्वासन दिले, पण ते पूर्ण न केल्यामुळे आपण विधानसभा निवडणुकांची तयारी करत असल्याचं मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. विशेष म्हणजे २९ ऑगस्ट रोजी



विधानसभा निवडणुकांसंदर्भात मनोज जरांगे यांच्याकडून घोषणा करण्यात येणार होती, पण त्यांनी आपला निर्णय पुढे ढकलला आहे. त्यामुळे, आता शेतकऱ्यांच्या न्याय व हक्कासाठी आपण लढा उभारणार असल्याची घोषणा करत, मनोज जरांगे यांनी पुढचे आंदोलन शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी करणार असल्याचे म्हटले आहे. आता, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी मी आंदोलन करनार असून राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघात याच अनुषंगाने बैठका घेणार असल्याचेही त्यानी जाहीर केले आहे. मतदार संघानिहाय बैठकांमध्ये मराठा आरक्षणासह शेतकरी आणि इतर सर्वच मुद्दे घेण्यात येणार असल्याचं मनोज जरांगे यांनी पान २ वर

### ५ सप्टेंबरपासून घोंगडी बैठका

निवडणुका आल्या की साड्या वाटतात, आताही यांचे तसेच सुरु झाले आहे. सगळे मुद्दे आम्ही ताकतीने लावून धरणार आहोत. त्यासाठी, ५ सप्टेंबर पासून विधानसभा मतदारसंघानिहाय घोंगडी बैठका होणार असल्याची घोषणाही मनोज जरांगे यांनी केली आहे.

### पृथ्वीराज चव्हाण यांनी घेतली भेट

मनोज जरांगे यांच्या भेटीसाठी सध्या नेतेमंडळी आणि आमदार, खासदारांच्या रांगा लागल्या आहेत. नुकतेच, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनीही मनोज जरांगे यांनी अंतरवालीत जाऊन भेट घेतली. मी केवळ त्यांच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी आलो होतो, असे जरांगे यांनी म्हटले.

### ७०० ते ८०० उमेदवार

महाराष्ट्रातील ७०० ते ८०० इच्छुक उमेदवारांनी माझी भेट घेतली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकांनी माझ्याशी संपर्क साधला. उमेदवारांचे फार भयाण काम आहे. उमेदवार पाहिले की वाटते कुठून या लफड्यात पडलो. मरणाचे उमेदवार आहेत. माझ्याकडे ७०० ते ८०० लोक आले. आम्हाला वाटतं होतं की मराठवाड्यातून सर्वाधिक अर्ज येतील, पण सर्वात जास्त अर्ज पश्चिम महाराष्ट्रातून आले आहेत. त्यानंतर नंबर २ ला मराठवाड्यातून आले. आम्ही त्यासाठी लोक बसवलेत. मला त्यातील जास्त काही जमत नाही, असे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

## थोडक्यात...

### ...तर सुप्रीम कोर्टाला टाळे ठोकलं पाहिजे-राऊत

जळगाव : शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी शिवसेना पक्ष आणि चिन्ह व ४० आमदारांच्या अपात्रेबाबत न्यायालयीन लढाई सुरू केली आहे. मात्र, या दोन्ही निर्णयावर अद्यापही सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणी झाली नाही. त्यामुळे संजय राऊत यांनी थेट सर्वोच्च न्यायालयास टाळं ठोकण्याची भाषा केली आहे. अंधा कानूनचे डोळे काढण्याची वेळ आली आहे, तीन वर्षे झाले तरी कोर्टात न्याय मिळत नसेल तर सुप्रीम कोर्टाला टाळं लावायला पाहिजे, अशी भाषा राऊत यांनी वापरली. शुक्रवारी जळगाव जिल्ह्यातील शिव संवाद मेळाव्यात ते बोलत होते.

### सोनं-चांदी दरात झाली मोठी घसरण

मुंबई-सोन्या चांदीची खरेदी करणाऱ्यासाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. सोन्या चांदीच्या दरात घसरण झाली आहे. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशनच्या मते, गुरुवारी (२२ तारखेला) संध्याकाळी २४ कॅरेट सोन्याचा दर ७१५९९ रुपये प्रति १० ग्रॅम होता. जो आज २३ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ७१३२५ रुपयांवर घसरला आहे. आज सोन्याच्या दरात २७४ रुपयांची घसरण झाली आहे.

### जळगावचे १४ जण नेपाळमध्ये बुडाले

मुंबई : महाराष्ट्रातील पर्यटकांच्या बसला नेपाळमधील तानाहुन जिल्ह्यात अपघात झाला आहे. नेपाळमधील काठमांडुमध्ये निघालेल्या बसमध्ये एकूण ४० ते ४१ प्रवासी असल्याची माहिती मिळत आहे. हे सर्व प्रवासी महाराष्ट्रातील जळगावचे असल्याची माहिती समोर आली आहे. त्यापैकी १४ प्रवाशांचा मृत्यू झाला असून १६ ते १७ प्रवासी गंभीर जखमी असल्याचे समोर आले आहे. यासंदर्भात आता राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्विट करुन माहिती दिली आहे. जळगावमधून संबंधित अधिकारी नेपाळला जाणार असून मृतांचे पार्थिव मूळगावी आणण्यात येणार असल्याचे फडणवीसांनी म्हटले आहे.

# मुख्यमंत्री शेतकऱ्यांचे पैसे बुडविणाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून बसले !

## लाडकी बहीण योजनेसाठी कोट्यावधीचा खर्च मात्र शेतकऱ्यांसाठी पैसे नाहीत

### • स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी यांची टीका

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

**गुरूवारी कोल्हापुरात आलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे जिल्ह्यातील साखर कारखानदारांच्या मांडीला मांडी लावून बसले होते. त्यांनी लाडकी बहीण योजनेसाठी कोट्यावधी रुपये खर्चून मोठा कार्यक्रम घेतला परंतु त्यांना शेतकऱ्यांचे पैसे देण्यासाठी वेळ नसल्याची टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून करण्यात आली आहे.**

मुख्यमंत्री व कोल्हापूरचे पालकमंत्री यांच्या मध्यस्थीने सन २०२२-२३ या गळीत हंगामात तुटलेल्या उसाला प्रतिटन ३ हजारांपेक्षा कमी दर दिलेल्या कारखान्यांनी प्रतिटन १०० रुपये व ३ हजारांपेक्षा जादा दर दिलेल्या





कारखान्यांनी ५० रुपये दुसरा हप्ता देण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी स्वाभिमानीकडून करण्यात आली. परंतु सरकारने मागच्या ८ महिन्यात यावर कोणताही निर्णय अद्यापही घेतलेला नाही. सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकरी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मध्यस्थीने पान २ वर

### महापुरामुळे मोठे नुकसान

यंदा महापुरामुळे ऊस पाण्यात बुडून मोठे नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. सन २०२१ मध्येही महापूरात शेतकऱ्यांची राखरांगोळी झाली आहे. अशात जर कारखान्यांनी तातडीने दुसरा हप्ता जमा केला तर शेतकऱ्यांना आधार होईल. एकीकडे शेतकऱ्यांबद्दल कळवळा असल्याची नौटंकी राज्य सरकार करत आहे तर दुसरीकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे राखरांगोळी करून कारखानदारांचे हित जोपासत असल्याचा आरोप राजू शेट्टी यांनी केला.

# ॲड.प्रदीप चव्हाणच फुंकणार आष्टीतून तुतारी!

## चव्हाण यांच्याकडून जरांगे पाटलांचीही भेट

**बीड । प्रतिनिधी**

वंचित व गरजवंत यांच्यासाठी धावून जाणे हा ज्यांचा पिंडच राहिला आहे असे सामाजिक कार्यकर्ते व अभ्यासू व्यक्तिमत्व ॲड. प्रदीप चव्हाण यांनी आष्टी-शिरूर-पाटोदा विधानसभा मतदार संघातून शरदचंद्र पवार गटातून उमेदवारीसाठी प्रबळ दावा केला असून या पार्श्वभूमीवर श्री. चव्हाण यांनी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांचीही नुकतीच भेट घेतली आहे.

विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजल्यापासून इच्छुक उमेदवार मोर्चे बांधणी करताना दिसत आहेत. आष्टी-शिरूर-पाटोदा मतदार संघातही अनेक



अनेकजण गुडघ्याला बाशिंग बांधून तयार आहेत. जो तो आपापल्या सोयीच्या पक्षाकडून उमेदवारी मिळण्यासाठी चाचपणी करत आहे. शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळावी यासाठी अनेकजण इच्छुक आहेत. परंतु इच्छुकांच्या या भाऊगर्दीत ॲड. प्रदीप चव्हाण यांचीच दावेदारी प्रबळ पान २ वर

# महाविकास आघाडीचा आजचा महाराष्ट्र बंद मागे

## • बंद नाही मात्र आघाडीचे मुक आंदोलन होणार

**मुंबई । प्रतिनिधी**

बदलापूर घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीने शनिवारी (दि.२४) पुकारलेला बंद अखेर मागे घेतला आहे. या बंदबाबत उच्च न्यायालयाने मनाई केली होती. न्यायालयाच्या या निर्णयानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी बंद मागे घेण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे महाविकास आघाडीचे घटक पक्ष काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाने हा बंद मागे घेण्याचे जाहीर केले आहे.



याबाबत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी (दि.२३) पत्रकार परिषदेत बंद मागे घेत असल्याचे सांगितले.

महाविकास आघाडीने शनिवारी (दि.२४) पुकारलेला बंद भारतीय राज्यघटनेच्या मुलभूत अधिकारांच्या कक्षेत होता. तथापि मुंबई उच्च न्यायालयाने हा बंद घटनाबाह्य असल्याचा निर्वाळा दिला आहे. या निर्णयाविरूद्ध सर्वोच्च न्यायालयात तातडीने दाद मागणे वेळेच्या मर्यादेमुळे शक्य नाही. भारतीय न्यायव्यवस्था संविधानात्मक संस्था असल्याने संविधानाचा आदर राखून उद्याचा बंद मागे घ्यावा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार पान २ वर

# अज्ञात ड्रोनच्या घिरट्यांचा पोलीस प्रशासनाने तातडीने शोध घ्यावा

## आ.पंकजाताई मुंडे यांनी उपमुख्यमंत्र्यांसह एसपींकडे केली पत्राद्वारे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या काही दिवसांपासून अहमदनगर व बीड जिल्ह्यात ड्रोनच्या घिरट्याने ग्रामीण भागातील नागरिकामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चोरीच्या भीतीने नागरिक रात्र जागून काढत आहेत. हा प्रकार नेमका काय आहे? याचा शोध घेऊन पोलिस प्रशासनाला संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश द्यावेत अशी मागणी भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह दोन्ही जिल्ह्याच्या एसपींकडे एका पत्राद्वारे केली आहे.**



मागील एक महिन्यापासून हा प्रकार सुरू असल्याचे आढळून आले आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी, बीड, गेवराई, वडवणी, धारूर यासह अहमदनगर जिल्हयातील पाथर्डी व शेवगाव तालुक्यातील अनेक गावांमध्ये अशाच पद्धतीने ड्रोन घिरट्या घालत आहेत. ड्रोन च्या माध्यमातून चोरीसाठीची रेकी करत असल्याची पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२३ ऑगस्ट २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ४.०० क्विंटल | २,६९८ | २,६९८ | २,६९८ |
| ज्वारी/हायब्रिड :८९.०० क्विंटल | १,९०० | ६,६७० | २,३४३ |
| मूग :२१.५० क्विंटल | ६,५०० | ७,३०० | ६,८९६ |
| तूर : १७.५० क्विंटल | ९,९३१ | ९,९३१ | ९,९३१ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: ३९.०० क्विंटल | २,३१० | २,८०० | २,५४९ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ४४.०० क्विंटल | ४,००० | ४,१५० | ४,१०५ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ६,००० | ६,७१० | ६,३५५ |

# मराठा महासंघाचे अध्यक्ष बलभीम राखुंडे यांची आत्महत्या



करमाळा । प्रतिनिधी

मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही म्हणून हताश होत माजी नगरसेवक आणि मराठा महासंघाचे अध्यक्ष बलभीम राखुंडे यांनी आत्महत्या केली आहे. मराठा आरक्षणासाठी करमाळ्यातील माजी नगरसेवक तथा अखिल भारतीय मराठा महासंघाचे अध्यक्ष बलभीम राखुंडे यांनी जीवन संपवलं आहे. मराठा आरक्षण मिळावे मनोज जरांगे पाटील यांना आपला पान २ वर

# मुख्यमंत्रिपदाच्या चेहऱ्यासाठी उद्धव ठाकरेंचा आग्रह

## शरद पवार म्हणाले आमच्या पक्षात कोणालाही स्वारस्य नाही





**पुणे । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीमधील मुख्यमंत्रिपदाच्या चेहऱ्यावरून रस्सीखेच सुरूच असल्याचे दिसत आहे. एकीकडे चार भिंतीच्या आड तरी मुख्यमंत्रीपदाचा चेहरा ठरवण्याचा उद्धव ठाकरेंचा आग्रह तर आधी निवडणुकांना सामोरं जाऊ मग मुख्यमंत्री ठरवू, काँग्रेसची भूमिका असल्याने अद्याप तिढा सुटलेला नाही. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवारांनी त्यांच्या पक्षांची भूमिका जाहीर केली आहे. आम्हाला मुख्यमंत्रीपदात रस नाही, अशी स्पष्टोक्ती शरद पवारांनी दिली आहे. ते पुण्यात पान २ वर

# परळी वैद्यनाथ कृषी महोत्सव: तिसऱ्या दिवशीही राज्यभरातील शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद

## दर महिन्याला नोकरदाराप्रमाणे पैसा देणारी रेशीम शेती; शेतकऱ्यांनी नक्की प्रयोग करावा-महेंद्र ढवळे

**परळी वै.। प्रतिनिधी**

**परळी वैद्यनाथ येथे सुरू असलेल्या कृषी महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी आज देखील राज्यभरातून शेतकऱ्यांनी उदंड प्रतिसाद दिला आहे. राज्यातील विविध जिल्ह्यातील हजारो शेतकरी याठिकाणी भेट देऊन कृषी प्रदर्शनाचा लाभ घेत आहेत. गडचिरोली, अमरावती, नागपूर, रत्नागिरी, रायगड ते अगदी कोल्हापूर पासून या प्रदर्शनास शेतकरी बांधवानी उदंड प्रतिसाद दिल्याचे पाहायला मिळत आहे. कृषी प्रदर्शनात उभारण्यात आलेल्या विविध कृषी उत्पादने व उमेद अभियानातील महिला बचत गटांच्या स्टॉल्स वर खरेदीसाठी पुरुषांसह महिलांची देखील मोठी गर्दी उसळल्याचे पाहायला मिळाले.**

तांत्रिक सत्रात रेशीम शेतीवर मार्गदर्शन बदलत्या व असंतुलीत हवामानात शाश्वत उत्पन्नाच्या दृष्टीने



रेशीम शेती हा अत्यंत उपयुक्त पर्याय आहे. तुती, रेशीम कीटकांचे जीवनचक्र, खाद्य, कीड व्यवस्थापन, निर्जंतुकीकरण इत्यादी बाबी शास्त्रोक्त पद्धतीने केल्यास रेशीम शेती नगदी उत्पन्न देते. नोकरदारांना दर महिन्याला पगार असतो, त्याच पद्धतीने रेशीम शेतीतून दर महिन्याला शेतकऱ्यांना आर्थिक उत्पन्न मिळवणे सहज शक्य आहे, असे मत नागपूर रेशीम उपसंचालक श्री महेंद्र ढवळे यांनी आज कृषी महोत्सवात आयोजित तांत्रिक सत्रात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले. यावेळी शेतकऱ्यांना रेशीम शेतीचा काडी पासून माडी व माडी ते गाडी असा उन्नत प्रवास दाखवणारी चित्रफीतही दाखवण्यात आली. महाराष्ट्रात बीड जिल्हा हा रेशीम शेतीत प्रथम स्थानावर असून एकूण रेशीम उद्योगाच्या ४०% वाटा हा एकट्या बीड जिल्ह्याचा आहे. यावेळी परळी तालुक्यातील दौनापूर गावचे प्रगतशील शेतकरी अरविंद आघाव, मलनाथपुरचे बाबा सलगर यांच्या रेशीम शेतीतील यशोगाथा उपस्थित शेतकऱ्यांना सांगण्यात आल्या. बीडच्या लोळदगावाचे कृषी भूषण शिवराम पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# मंकीपॉक्सचे संकट घोंघावतेय...

कोरोना जगाला उद्ध्वस्त करून गेला, होत्याचे नव्हते झाले. जगातील अनेक देशांचे अर्थकारण बिघडविले. जगाने एकत्रितपणे कोरोनाविरोधात लढा देत कोरोनावर विजय मिळविला. कोरोनाच्या धक्क्यातून जग आताच कुठे सावरायला लागले असतानाच आता मंकीपॉक्सने पाय पसरले. कोरोनासारखेच मंकीपॉक्सच्या व्याप्तीची दखल जागतिक पातळीवर घेण्यात आली असून जगावर लॉकडाऊनचे संकट पुन्हा निर्माण होतेय की काय याची कुजबुज वैद्यकीय विश्वात सुरू झाली आहे. मंकीपॉक्स या आजाराची साथ दिसून आल्यामुळे जागतिक आरोग्य संघटनेने मंकीपॉक्सच्या साथीला जागतिक स्वास्थ्य आणीबाणी म्हणून घोषित केले आहे. मंकीपॉक्स संसर्गाचा वेग आणि रोगाची तीव्रता लक्षात घेता केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयानेही मार्गदर्शक सूचना जारी केल्या असून त्याची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये सर्व विमानतळ, बंदरे आणि आरोग्य पथकाला सतर्क करणे, चाचणी प्रयोगशाळा, मंकीपॉक्सचा एखादा रुग्ण सापडल्यास त्याच्यावर तत्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या आहेत.

मंकीपॉक्स आजार ओर्थोपोक्स या डीएनए प्रकारच्या विषाणूमुळे होतो. काही प्रकारच्या खारी आणि उंदरांत हा विषाणू आढळतो. अंगावर पुरळ उमटण्यापूर्वी १ ते २ दिवसांपासून ते त्वचेवरील फोडांवरील खपल्या पडेपर्यंत किंवा ते पूर्णपणे मावळेपर्यंत, बाधित रुग्ण इतर व्यक्तींसाठी संसर्गजन्य असतो. मंकीपॉक्स हा प्रामुख्याने थेट शारीरिक संपर्क, लैंगिक संपर्क किंवा जखम, घाव यातील स्राव, जर खूप वेळ बाधित व्यक्तीचा संपर्क आला तर श्वसन मार्गातून बाहेर पडणाऱ्या मोठ्या थेंबावाटे होणाऱ्या संसर्गाद्वारे होऊ शकतो. त्याचप्रमाणे, प्राण्यांपासून माणसालाही मंकीपॉक्सची लागण होऊ शकते. मंकीपॉक्स रुग्णाला मागील ३ आठवड्यांत मंकीपॉक्सबाधित देशांमध्ये प्रवास करून राज्यात आलेल्या व्यक्तींच्या शरीरावर अचानक पुरळ उठणे, ताप, डोकेदुखी, अंगदुखी, प्रचंड थकवा, घसा खवखवणे आणि खोकला अशा प्रकारची लक्षणे आढळून आली आहेत. यामुळे काळजी घेतली जात आहे. मंकीपॉक्स आजाराचे सर्वेक्षण, प्रतिबंध आणि नियंत्रण त्यानुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत निर्देश सार्वजनिक आरोग्य विभागाने दिले आहेत. यानुसार आरोग्य सेवा आयुक्त रंगा नायक यांनी विभाग प्रमुखांसोबत बैठक घेऊन सर्व क्षेत्रीय आरोग्य उपसंचालक, महापालिकांचे आरोग्य अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक यांना सूचना दिल्या आहेत.

कोरोना भारतात दाखल झाल्यावरही विमानतळे बंद करणे, बाहेरील देशातून येणाऱ्यांना भारतात येण्यास मज्जाव करणे याबाबतीत आपणास काही प्रमाणात विलंब झाला होता आणि त्याचीच आपणास फार मोठी किंमत मोजावी लागली होती. त्यापासून धडा घेत भारताने मंकीपॉक्सच्या पार्श्वभूमीवर मंकीपॉक्सच्या आजाराबाबत जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या सूचनेनुसार केंद्र सरकारने उच्चस्तरीय बैठक घेऊन प्रतिबंध व उपाययोजना राबविण्याबाबत सूचना दिल्या आहेत. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने राज्यांना मार्गदर्शक सूचना केल्या आहेत. यामध्ये सर्व आरोग्य युनिट्सना सतर्क करणे, तपासणीसाठी आरोग्य सुविधा तयार करणे, मंकीपॉक्सचा एखादा रुग्ण सापडल्यास तत्काळ उपाययोजना करण्यात याव्यात याचा सामावेश आहे. यानुसार राज्याने याबाबत सर्वेक्षण, प्रतिबंधक मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

कोरोना महामारीचा उद्रेक जागतिक पातळीवर झालेला असतानाच कोरोनावर तात्काळ उपाययोजना करण्यात जागतिक पातळीवर त्या त्या देशातील आरोग्य यंत्रणांना मर्यादा पडल्या होत्या. परंतु मंकीपॉक्सवर मात्र उपाययोजना करताना लसीकरणासाठी हालचाली सुरु झाल्या आहेत.

मंकीपॉक्स आजाराची रुग्णसंख्या वाढत असल्याने जगभरात चिंता व्यक्त केली जात आहे. आफ्रिकेतील बाराहून अधिक देशांमध्ये मुले आणि प्रौढांना मंकीपॉक्सची लागण झाली आहे. आता या आजारावर स्वदेशी लसीचे काम सुरू कर्‌ण्यात आले असून ते सिरम इन्स्टिट्यूटमध्ये केले जात आहे. पुण्यातील सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाने मंकीपॉक्सवरील स्वदेशी लसीची निर्मिती करण्यात येत असल्याचे जाहीर केले. वर्षभरात सकारात्मक निष्कर्ष हाती येण्याची आशा आहे. कोरोनाच्या अनुभवातून सावध झालेल्या आम्हा भारतीयांनी मंकीपॉक्सबाबत सरकारने व आरोग्य विभागाने घालून दिलेल्या निर्बंधाचे पालन करणे आवश्यक आहे.

# बदलापूर घटनेच्या निषेधार्थ मविआचा बंद मागे:काळ्या फिती लावून करणार धरणे आंदोलन

**जालना । प्रतिनिधी**

**बदलापूर येथील एका शाळेतील दोन बालिकांवर झालेल्या अत्याचाराची घटना आणि त्यानंतर पोलिसांनी पीडित मुलींच्या कुटुंबाला दिलेली वागणूक निंदनीय आहे. या घटनेच्या निषेधार्थ उद्या शनिवार दि.२४ ऑगस्ट रोजी महाविकास आघाडीच्या वतीने पुकारण्यात आलेला राज्यव्यापी बंद न्यायालयाच्या आदेशानुसार मागे घेण्यात आला असून बंद ऐवजी शहरातील गांधी चमन येथे सकाळी ११ ते १२ या वेळेत काळ्या फिती लावून धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती आ. कैलास गोरंटयाल आणि शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी आज येथे एका संयुक्त पत्रकार परिषदेत बोलतांना दिली.**



शहरातील हॉटेल अंबर मध्ये आयोजित करण्यात आलेल्या या पत्रकार परिषदेत अंबेकर म्हणाले की, बदलापूर येथील घटना ही अत्यंत दुर्दैवी असून ही घटना घडल्यानंतर पीडित मुलींच्या आईची तक्रार जाणीवपूर्वक १२ तास विलंबाने घेण्यात आली. बदलापूर आणि परिसरातील जनक्षोभ उसळल्यानंतर शासनाला जाग आली. एकीकडे राज्य शासन लाडकी बहिण योजनेचे भांडवल करत फिरत असतांना दुसरीकडे बदलापूरसह राज्यातील अनेक जिल्ह्यात दररोज अत्याचाराच्या घटना घडत आहेत. मोठया प्रमाणावर घडत असलेल्या या अत्याचारांच्या घटनांकडे सरकार मात्र, डोळेझाक करत असल्याचा आरोप अंबेकर यांनी केला. आ. कैलास गोरंटयाल यावेळी बोलतांना म्हणाले की, बदलापूर येथील अत्याचाराच्या घटनेमुळे मन सुन्न झाले आहे. या घटनेचे राज्यभरात तीव्र पडसाद उमटत असून याच घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीच्या वतीने उद्या शनिवारी राज्यव्यापी बंद पुकारला होता. अत्याचार झालेल्या पीडित मुलीची आई तक्रार देण्यासाठी पोलिस ठाण्यात गेली असता तेथील स्थानिक पोलिसांनी तब्बल १२ तासानंतर त्यांची तक्रार घेतली. विशेष म्हणजे पिडितेची आई गरोदर असतांनाही पोलीसांनी सदर महिलेची तक्रार घेण्यास ताटकळत ठेवले ही बाब त्याहून दुर्दैवी असल्याची टीका आ. कैलास गोरंटयाल यांनी यावेळी केली. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घटनेला चार दिवस उलटूनही या प्रकरणी अद्याप तोंड उघडलेले नाही. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बदलापुरात झालेल्या आंदोलनात बाहेरच्या लोकांचा सहभाग मोठया प्रमाणात होता असा अजब दावा त्यांनी केला. बदलापूर हे मुख्यमंत्र्यांचे चिरंजीव खा. श्रीकांत शिंदे यांच्या मतदार संघात येत असल्याने नैतिक जबाबदारी स्वीकारून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी करून आगामी काळात पुन्हा अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी महाविकास आघाडीच्या वतीने शनिवारी बंद पुकारला आला होता. मात्र, न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांनी मागे घेत शनिवारी सकाळी ११ ते १२ या वेळेत काळ्या फिती लावून धरणे आंदोलन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. जालन्यात शहरातील गांधी चमन येथे महाविकास आघाडीच्या वतीने सकाळी ११ ते १२ या वेळेत धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती आ.कैलास गोरंटयाल आणि भास्करराव अंबेकर यांनी यावेळी दिली. महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी या आंदोलनात मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आ. कैलास गोरंटयाल, भास्करराव अंबेकर यांनी यावेळी केले. या पत्रकार परिषदेस युवा नेते अक्षय गोरंटयाल, जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र राख, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष विजय चौधरी, विनोद यादव, राजेश पवार, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष राजेंद्र जाधव, दत्ता पाटील घुले, बापू साळवे, संतोष देवडे आदींची उपस्थिती होती.

### कायदा व सुव्यवस्थेची अपेक्षा कशी ठेवणार ?

राज्यातील पोलिस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पोलिस अधीक्षकांच्या बदल्या या हर्राशी पद्धतीने होत असल्याचा खळबळजनक आरोप जालन्याचे आ. कैलास गोरंटयाल यांनी पत्रकार परिषदेत केला आहे. हर्राशी पद्धतीने बदल्या होत असल्याने अशा अधिकाऱ्यांकडून कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या अपेक्षा कशी ठेवणार असा सवाल उपस्थित करत राज्यात जवळपास सर्वत्रच कायदा व सुव्यवस्थेचे धिंडवडे उडाले असून गुंडागर्दी करणाऱ्यांवर पोलिसांचा कोणत्याही प्रकारचा धाक राहिलेला नाही अशी परिस्थिती या राज्य सरकारच्या काळात निर्माण झाली असून असे सरकार आपण प्रथमच बघितले असल्याची टीका यावेळी आ. गोरंटयाल यांनी पत्रकारांशी बोलतांना केली.

## अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त खानापूर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन

**माजलगाव । प्रतिनिधी**

**तालुक्यातील खानापूर येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या१०४वी. जयंतीनिमित्त २५ ऑगस्ट रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजना करण्यात आली असून या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांची तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नितीन नाईकनवरे यांची उपस्थिती राहणार असून या कार्यक्रमास लोकसंख्येने हजर राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सिताराम क्षीरसागर यांनी केले.**



या पत्रकार पुढे म्हटले आहे की,२५ ऑगस्ट रोजी सकाळी १० वा. माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार असून संध्याकाळी ७ वाजता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर आधारित गीताचा कार्यक्रम होणार आहे या कार्यक्रमास बहुजन विकास मोर्चाचे नेते बाबुराव पोटभरे, शिवाजीभाऊ रांजण,ओबीसी नेते महादेव निर्मळ, मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष मिलिंद आव्हाड, भाजपचे नेते रमेश आडसकर,सुंदररावं सोळंके सहकारी कारखान्याचे व्हॉइस चेअरमन जयसिंह सोळंके,राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस कचरू तात्या खळगे राज्य सरचिटणीस दयानंद स्वामी, तुळजाभवानी बँकेचे अध्यक्ष चंद्रकांत शेजुळं, चर्मकार समाजाचे नेते नानासाहेब घोडके, अमोल शेरकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तरी या कार्यक्रमास बहुसंख्येने हजर राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सितारामजी शिरसागर, गोपीनाथ शिरसागर, उपाध्यक्ष चिकू सतपुते, सुमित शिरसागर, धीरज शिरसट, आदित्य कांबळे यांनी केले आहे.

# आ.नारायण कुचे यांची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करणार-घुगे

## बदनापूर विधानसभा शिवसेना लढणार

**जालना । प्रतिनिधी**

**बदनापूर हा मतदार संघ शिवसेनेचा बाल किल्ला असून ही जागा शिवसेना घेणार व तसेच भाजपचे आमदार नारायण कुचे हे महायुतीचा धर्म पाळीत नाही व तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे गटाचे कार्यकर्त्याला न्याय दिला जात नाही तसेच या प्रकरणी मुख्यमंत्री यांना भेटून ही जागा शिवसेनेला देण्यात यावे अशी मागणी करण्यात येणार आहे. आज बदनापूर येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना रक्षाबंधन सन्मान सोहळा बदनापूर येथे आज शिवसेना जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब घुगे यांनी आयोजित केलेल्या भव्य दिव्य कार्यक्रम संपन्न मेळाव्याला**

मोठ्या संख्येने महिलांनी सहभाग नोंदवला होता मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजनेचा सन्मान सोहळाला उदंड प्रतिसाद मिळाला असून रक्षाबंधनाचा कार्यक्रम तसेच महिलांचा सत्कार सन्मान केला लाडक्या बहिणींना फेटे बांधत एक आकर्षक वातावरण निर्माण झाले होते तर लाडक्या बहिणीला गिफ्ट स्वरूपात भेटवस्तू देण्यात आले आहे यावेळी अर्जुन खोतकर यावेळी स्थानिक आमदार महायुतीचा धर्म पाळत नाही विविध कार्यक्रमात जाणबुजून मित्र पक्षांना टाळण्याचा प्रयत्न करतात याचा खेद राज्याचे मुख्यमंत्र्यांच्याकडे व्यक्त करणार आसलेल्याच विधान केले तसेच बदनापूर मतदार संघ शिवसेनेचा कायम राहिलेला बालेकिल्ला आहे येणाऱ्या विधानसभेला शिवसेनेला जागा सोडण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करणार असलेलेच खोतकर म्हणाले शिवसेनेच्या कार्यकर्त्यावर व उपदाधिकाऱ्याला डावल जात असेल तर अजिबात खपवून घेतल्या जाणार नाही ज्यांच्या डोक्यात मस्ती असेल ती मस्ती जिरण्याची ताकद शिवसेनेमध्ये आहे असे ते बोलत होते जिल्हाभरामध्ये मोर्चे बांधणी व कार्यकर्ता मेळावा घेऊन शिवसेनेची ताकद वाढवण्याचे निर्धार जिल्हाध्यक्ष या नात्याने घेतला आहे येणाऱ्या काळामध्ये जिल्हात पक्ष संघटन बळकट करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करण्याचंहे या मेळाव्यात जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब घुगे यांनी प्रतिपादन केले यावेळी आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मंत्री तथा शिवसेनेचे उपनेते अर्जुन खोतकर तसेच शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भूतेकर, युवा सेनेचे प्रदेश सचिव अभिमन्यू खोतकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते सह संपर्कप्रमुख ॲड सुनील किनगावकर,फिरोजलाला तांबोळी, मराठवाडा अल्पसंख्या आघाडी प्रमुख असलमखान पठाण,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल,शिवसेनेची महिला आघाडी संपर्कप्रमुख सविताताई कीवंडे,महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख कालिंदाताई ढगे, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते,शिवसेनेचे ज्येष्ठ नेते बाबासाहेब इंगळे, भाऊसाहेब पाऊलबुद्धे, उपजिल्हाप्रमुख राजेंद्र लाड,भालचंद्र भोजने, भूषण शर्मा ,महिला आघाडीचे ज्येष्ठ नेत्या विजाताई चौधरी, शिवसेनेचे जालना शहर प्रमुख विष्णू पाचफुले,आत्मानंद भक्त, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख अमोल ठाकूर,यांची विशेष उपस्थितीती होती. तसेच शिवसेना तालुकाप्रमुख कल्याण आवघड, विधानसभा सघटक कैलास दुधानी, ईश्वर झुंबड,भगवानराव कदम, माधव गीते, हरिभाऊ कापसे, अंबादास कळसकर,दिलीप मंत्री,कैलास खैरे,अमोल दाभाडे, कैलास वैद्य,भगवान ढाकणे, अशोक आंबीलढगे, दीपक दिघे, गणेश शिंदे, राजेंद्र चौधरी ,रामेश्वर नागवे, मनोज शिंदे ,नारायण ब्राह्मणे,रमेश चोरमारे,गणपत केकान,आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# बीडमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज आंदोलन

## नागरिक महिला भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहा- आ.संदीप क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

**बदलापूर घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीकडून पुकारण्यात आलेला बंद सध्या मागे घेण्यात आला असून, त्याऐवजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार आहे. यासाठी सर्व नागरिक, महिला भगिनी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.**

ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे दोन चिमुलींवर त्या शिक्षण घेत असलेल्या शाळेतच लैंगिक अत्याचार झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आणि या गंभीर प्रकरणावर पोलिसांनी दाबादाबी करण्याचा प्रयत्न केला होता. पीडितेची आई ज्यावेळी तक्रार दाखल करण्यासाठी पोलीस स्टेशन मध्ये गेली असता त्यांना तासनतास ठाण्यात बसवून ठेवण्यात आले. याउलट या प्रकरणाचा निषेध व्यक्त करण्यासाठी रस्त्यावर उतरलेल्या नागरिकांच्या विरोधात पोलिसांनी तातडीने गुन्हे दाखल केले. म्हणजे लहानग्या मुलींवर अत्याचार झाल्याचे गंभीर प्रकरण असताना त्यात पोलिसांनी अजिबात तत्परता दाखवली नाही या प्रकरणावर आवाज उचलणाऱ्या नागरिकांचा आवाज दाबण्यासाठी मात्र पोलीस तत्पर असल्याचे स्पष्ट झाले आहे. या सर्व प्रकारचा निषेध व्यक्त करण्यासाठी महाविकास आघाडीकडून शनिवार दि. २४ ऑगस्ट रोजी बंद पुकारण्यात आला होता. परंतु हा बंद भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत अधिकारांच्या कक्षेत होता त्यामुळे मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदरचा बंद घटनाबाह्य असल्याचा निर्वाळा दिला आहे. सदरच्या निर्णयाविरुद्ध मा.सर्वोच न्यायालयात तातडीने दाद मागणे वेळेच्या मर्यादेमुळे शक्य नाही. त्यामुळे वरिष्ठांच्या आदेशानुसार शनिवार दि.२४ ऑगस्ट रोजीचा बंद मागे घेण्यात आला असून त्याऐवजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार आहे. बदलापूर घटना आणि देशभरात होत असलेल्या महिला आणि बालकांवर अत्याचाराच्या घटनांचा निषेध व्यक्त करण्यासाठी सामान्य नागरिक, महिला भगिनी यांनी मोठ्या संख्येने उपस्तित राहा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.



## पान १वरून...

### आरक्षण लढ्यानंतर आता

आजच्या पत्रकार परिषदेतून सांगितले. लवकरच शेतकऱ्यांसाठी आंदोलन सुरू करणार असून शेतकऱ्यांची कर्जमुक्ती झाली पाहिजे, ही आमची प्रमुख मागणी आहे. शेतकऱ्याची कर्जमाफी आणि पीकविम्याचे पैसे राहिले आहेत, सरकार प्रत्येकवेळी शेतकऱ्यांना फसवते, आता सरकार कसे कर्जमाफी करत नाहीत हे पाहतो, असेही जरांगे यांनी म्हटले.

---------

### ॲड.प्रदीप चव्हाणच

फसमजली जात आहे. कारण राजकारणात येऊन स्वतःचे प्रस्थ वाढवणारे अनेक असतात. परंतु राजकारण हे लोककल्याणाचे प्रभावी माध्यम आहे याचे भान असणारे व्यक्तिमत्व फारच दुर्मिळ झाले आहे. ॲड. प्रदीप चव्हाण हे असेच एक दुर्मिळ व फक्त लोकहिताला प्राधान्य देणारे व्यक्तिमत्व आहे. श्री. चव्हाण यांनी शरद पवार गटाकडून उमेदवारीसाठी दावा केला असून त्यांची एकूण पार्श्वभूमी बघता त्यांनाच उमेदवारी मिळणार हे जवळपास निश्चित झाले आहे. या पार्श्वभूमीवर गरजवंत मराठ्यांसाठी लढणारे संगर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचीही ॲड. प्रदीप चव्हाण यांनी नुकतीच भेट घेतली असून जरांगे पाटील व श्री. चव्हाण यांच्यात सकारात्मक चर्चा झाल्याचे समजते. पक्षाकडून ॲड. प्रदीप चव्हाण यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब होण्याचे संकेत निश्चित असतानाच श्री. चव्हाण यांचा अभ्यास शेतकर्यांच्या प्रश्नावरील अभ्यास, वकीली व्यवसाय असल्याने कायदेशीर ज्ञान, आंबेडकरी विचारांचा प्रभाव असल्याने सर्व जाती आणि धर्मांना सोबत घेऊन चालण्याची तळमळ, जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्याची हातोटी, समाजाबद्दल असलेली त्यांची तळमळ पाहता त्यांच्या दावेदारीने मतदारांमध्येही उत्साह व आनंदाचे वातावरण असून प्रस्थापितांच्या राजकारणाला झुगारून आष्टी मतदार संघाला खऱ्या अर्थाने विकासाकडे घेऊन जाणारा मोहरा ॲड. प्रदीप चव्हाण यांच्या रूपाने मिळत असल्याची लोकभावना मतदार संघात सर्वत्र दिसत आहे.

-------------

### मुख्यमंत्री शेतकऱ्यांचे पैसे बुडविणाऱ्यांच्याफ

तोडगा निघालेल्या १०० रूपयाच्या दुसऱ्या हप्त्याची वाट बघतोय. साखर कारखाने आठ महिन्यापूर्वी राज्य सरकारकडे मान्यतेसाठीचे प्रस्ताव पाठविले आहेत. मात्र कारखानदारांच्या दबावास बळी पडून मुख्यमंत्री सदर प्रस्तावास मान्यता देण्यास टाळाटाळ करत आहेत. गुरूवारी मुख्यमंत्री कोल्हापूर जिल्ह्यातील डझनभर कारखानदारांच्या मांडीला मांडी लावून बसले व त्यांच्या दबावास बळी पडून त्यांनी १०० रूपये प्रस्तावाची घोषणा केली नाही. दोन दोन वर्षे कारखान्यांचा हिशोब राज्य सरकारकडून केले जात नाहीत. शेतकरी आपल्या घामाच दाम मागतोय तर मुख्यमंत्री व कारखानदार दोघेही ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आत्महत्येस प्रवृत्त करून बहिणीच्या कपाळाचे कुंकू पुसत आहेत का? असा सवाल संघटनेने उपस्थित केला आहे.

------

### महाविकास आघाडीचा

यांनी केले होते. अखेर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे बंद मागे घेत असल्याचे पत्रकार परिषदेत सांगितले. महाविकास आघाडीने पुकारलेल्या बंदला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्यानंतर न्यायालयाने बंद बेकायदेशीर ठरवत परवानगी नाकारली. यावर ठाकरे म्हणाले की, उच्च न्यायालयाचा हा निर्णय आम्हाला मान्य नाही. परंतु आम्ही या निर्णयाचा आदर राखतो. या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याची ही वेळ नाही. लोकांनी भावना व्यक्त करू नयेत का ? असा सवाल ठाकरे यांनी केला. दरम्यान, बंद मागे घेतला असला तरी आघाडीकडून निषेध आंदोलन करण्यात येणार आहे. काळ्या फिती लावून या घटनेचा निषेध करण्यात येणार आहे.

**शिवसेना भवनासमोरील चौकात**
**स्वत: आंदोलन करणार - ठाकरे**

बंदऐवजी महाविकास आघाडीचे नेते मूक आंदोलन करतील. राज्यभरात शिवसैनिक काळ्या फिती लावून झेंडे दाखवून आंदोलन करणार आहेत. शनिवारी सकाळी अकरा वजाता शिवसेना भवन येथे काळ्या फिती लावून मूक आंदोलन केले जाईल. बंद मागे घेत असला, तरी आंदोलन थांबणार नाही. शिवसेना भवनासमोरील चौकात मी स्वत: आंदोलन करणार असल्याचे ठाकरे यांनी सांगितले.

बंदला सुभाष झा, गुणरत्न सदावर्ते यांचे आव्हान

बदलापूर येथील शाळेत चिमुकलींवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीने शनिवारी (दि.२४) महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. दरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाने कोणत्याही राजकीय पक्ष अथवा व्यक्तीला महाराष्ट्र बंद पुकारण्यास मनाई केली. या 'बंद'ला वकील सुभाष झा आणि गुणरत्न सदावर्ते यांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्यावर न्यायालयाने महाविकास आघाडीला बंद पुकारण्यापासून रोखले.

**न्यायालयाने हीच तत्परता आरोपींना शिक्षा देण्यासाठी दाखवावी - उद्धव ठाकरे**

उच्च न्यायालयाचा निर्णय आम्हाला मान्य नाही, पण न्यायालयाचा आदर राखला पाहिजे, म्हणून आम्ही बंद मागे घेत आहोत. पण, उच्च न्यायालयाने बंदबाबत जितक्या तत्परतेने निर्णय घेतला, तितक्याच तत्परतेने गुन्हेगारांना शिक्षा द्यावी, अशी मागणीपर विनंती उद्धव ठाकरेंनी न्यायालयाकडे केली आहे. राज्यभरात मविआचे कार्यकर्ते तोंडाला काळी फीत बांधून राज्यभर आंदोलन करतील, असेही उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले. तसेच, आंदोलन करण्याचा अधिकार राहिला की नाही, असेही ठाकरेंनी म्हटले.

---------

### अज्ञात ड्रोनच्या घिरट्यांचा पोलीस

अफवा नागरिकांमध्ये आहे, त्यामूळे नागरिकांची झोप उडाली असून ग्रामस्थांमध्ये दहशत आणि भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.दरम्यान, हया सर्व प्रकारात आपण स्वतः गांभीर्याने लक्ष घालून हा प्रकार नेमका काय आहे? याचा शोध घ्यावा आणि नागरिकांमध्ये निर्माण झालेली भिती पोलीस प्रशासनाकडून दूर करावी तसेच सध्या दोन्ही जिल्हयातील ग्रामीण भागात रात्रीच्या चोऱ्या व दरोडयांचे प्रमाण वाढलेले आहे यासाठी रात्रीच्या गस्त घालणारे पोलीस पथक तयार करुन रात्रीची गस्त वाढवावी तसेच असे प्रकार करणारांविरूध्द कठोर कारवाई करावी आणि नागरीकांनी भयभीत होऊ नये यासाठी प्रशासकीय पातळीवर योग्य उपाययोजना कराव्यात अशी विनंती आ. पंकजाताई मुंडे पत्राद्वारे केली आहे.

-------------

### मुख्यमंत्रिपदाच्या चेहऱ्यासाठी

पत्रकार परिषदेत बोलत होते. शरद पवार म्हणाले, आमच्याकडे मुख्यमंत्रीपदामध्ये कोणालाही इंटरेस्ट नाही. आम्हाला परिवर्तन हवं आहे, जनतेला पर्याय हवं आहे त्यासाठी आम्ही काम करत आहोत. लोकांना पर्याय हवाय तो पर्याय उपलब्ध व्हावा. ३ सप्टेंबरला कागलमध्ये जातोय तिकडे सभा घेणार आहे. अनेक जण येत आहेत. कामानिमित्त अनेकजण भेटत आहेत. तीन पक्ष एकत्रित आहेत अजून डावे पक्ष यावेत अशी इच्छा आहे.

-------------

### मराठा महासंघाचे अध्यक्ष

पाठिंबा असल्याचे पत्र लिहीत बलभीम राखुंडे यांनी राहत्या घरी आत्महत्या केलीये. बलभीम राखुंडे यांनी आत्महत्या केल्याने समाजातील सर्व स्तरातून शोक व्यक्त केला जात आहे.

--------

### परळी वैद्यनाथ कृषी महोत्सव: तिसऱ्या

घोडके व रामप्रसाद डोईफोडे यांनी सेंद्रिय पद्धतीने शेती करण्याच्या पद्धती व फायदे यावर मार्गदर्शन केले. चर्चा सत्रास अध्यक्ष स्थानी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठचे सेंद्रिय शेती संशोधन विभागाचे अन्वेषक डॉ.आनंद गोरे, रेशीम शेती संशोधन केंद्राचे डॉ.चंद्रकांत लटपटे, कृषी विज्ञान केंद्र खामगावच्या डॉ.दीप्ती पाटगावकर, कृषी विद्यावेत्ता डॉ.वसंत सूर्यवंशी, डॉ.रमण देशपांडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांसह आदी उपस्थित होते.


## टी.सी.हरवला आहे

मयूर वचिष्ठ शेळके या नावाचा दहावी पासचा टी.सी. बीड ते धारवंटा एस.टी प्रवासा दरम्यान हरवला आहे. ज्या कोणास सापडल्यास संपर्क करा.

**संकर्प::- मय वशिष्ठ शेळके, मो. ८३२९५४२०४१**

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. २४ ऑगस्ट २०२४


## तुलसी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिन साजरा



**बीड । प्रतिनिधी**

येथील तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६६ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण प्राचार्य प्रो.डॉ.एल.एम.थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# कोण काय म्हणतय यापेक्षा आपण जनतेच्या समस्या सोडवण्याला महत्त्व देतो -आ.बाळासाहेब आजबे

**आष्टी । प्रतिनिधी**

मतदार संघात आजपर्यंत आपण मोठ्या प्रमाणात विकास कामे मंजूर करून आणली आहेत गावागावात विकास कामे झाली असून काही मंजूर कामांचा नारळ फोडणेचा कार्यक्रम गाव भेट दौऱ्यामध्ये होत आहे तर महाराष्ट्र शासनाच्या वतीने वेगवेगळ्या लोक कल्याणकारी योजना राबवल्या जात आहेत या योजना प्रत्येक गावामध्ये सामान्य जनतेपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे त्याचबरोबर गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत आपण गावात केलेली विकासकामाचे लोकार्पण व मंजूर कामांचे उदघाटन करणे व ही कामे जनतेला माहिती व्हावेत या उद्देशाने हा गाव भेट दौरा सुरू आहे परंतु विरोधकांकडून मी करत असलेल्या मंजूर कामांच्या उद्घाटनाबाबत टीका केली जात आहे, कोण काय म्हणतंय यापेक्षा आपण जनतेच्या समस्या सोडवण्याला महत्त्व देत असून योग्य वेळी आपण सर्व आरोपांना सविस्तर उत्तर देऊ असे आमदार बाळासाहेब आजबे यांनीआष्टी तालुक्यात सलेवडगाव येथे गाव भेट दौऱ्या दरम्यान बोलताना सांगितले.

आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे कर्तव्यदक्ष आमदार बाळासाहेब आजबे यांचा गाव भेट दौरा सुरू असून शुक्रवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी दौलावडगाव गणातील गाव पेठ दौरा संपन्न झाला यावेळी त्यांच्या समावेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष काकासाहेब शिंदे ज्येष्ठ नेते हरिभाऊ दहातोंडे, परसराम आबा मराठे ,महादेव डोके ,माजी सभापती संतोष गुंड ,पप्पू गवळी,बबन रांजणे रामहरी ठोंबरे विठ्ठल नागरगोजे यांची प्रमुख उपस्थितीत होती, पुढे बोलताना आ आजबे म्हणाले कि गेल्या पाच वर्षाच्या कारकीर्दीमध्ये आपण मतदारसंघांमध्ये मूलभूत गरजा लक्षात घेता शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असणारा पाणी ,रस्ते विजेचा प्रश्न प्रामुख्याने हाताळत तो कसा सोडवता येईल यासाठी प्राधान्यानेअनेक गावांमध्ये कोट्यवधी रुपयांचे बंधाऱ्याची कामे मंजूर केली आहेत तर पांदण रस्ता योजनेच्या माध्यमातून ५०० पेक्षा जास्त रस्त्यांचा प्रश्न मार्गी लावला आहे त्याचबरोबर इतर विकास कामे मोठ्या प्रमाणात केली .

आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बाळासाहेब आजबे यांचा गाव भेट दौरा सध्या सुरू असून शुक्रवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी अंभोरा, सालेवडगाव,दौलावडगाव, बांदखेल,केळ, पिंपळगाव,मराठवाडी, हरेवाडी या



ठिकाणी ग्रामस्थांची भेटी देऊन पुढे बोलताना आमदार आजबे म्हणाले की आष्टी विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावात जाऊन आपण पाच वर्षात केलेली कामे त्या कामांचे लोकार्पण व उद्घाटन करून ती कामे लोकांपर्यंत पोहोचण्याचे काम या दौऱ्याच्या निमित्ताने केली जाणार आहे ,त्याचबरोबर शासनाने ज्या लोक कल्याणकारी योजना जाहीर केल्या आहेत त्या योजनांची माहिती ग्रामस्थांच्या भेटी गाठी घेण्यासाठी व गावात झालेल्या कामांची माहिती लोकांना व्हावी म्हणून हा दौरा आयोजित केला आहे लाडकी बहीण योजना, सौर पंप योजना ,मोफत गॅस योजना , मुलींसाठी मोफत शिक्षण योजना यासारख्या शासनाच्या लोक कल्याणकारी योजनांचा जनतेने लाभ घ्यावा व कार्यकर्त्यांनी ही योजना त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचे काम करावे शेतकऱ्यांनी कापूस व सोयाबीन पिकांचा पीक पेरा लावून घ्यावा जेणेकरून हेक्टरी पाच हजार रुपये अनुदान मिळण्यास मदत होईल, गेल्या पाच वर्षांमध्ये आपण कोणाचे वाईट होईल असे कोणतेही काम केले नाही, आमदार हा लोकांच्या समस्या सोडण्यासाठी असतो समस्या निर्माण करण्यासाठी नसतो म्हणून पाच वर्षाच्या काळात आपण भावाभावात किंवा गावागावात भांडण लावण्याचे काम केले नसून आपसातील भांडणे मिटवण्याचे प्रामाणिक काम केले आहे म्हणून गेल्या पाच वर्षांमध्ये तालुक्यामध्ये शांतता नांदत आहे, आपण गेल्या साडेचार वर्षाच्या कार्यकाळात मतदार संघात जवळपास तीन ते साडेतीन हजार कोटी रुपयांची विविध विकासकामे मंजूर करून आणून ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले आहेत त्यामुळे मतदारसंघातील गाव ,वाडी ,वस्ती या प्रत्येक ठिकाणी विकास कामे झालेली आहेत कोणत्याही कामांमध्ये अनियमितता झालेली नसून लोकांना विकास कामे दिसत असल्यामुळेच लोकांचा पाठिंबा आपल्याला मिळत असल्याचेही आमदार बाळासाहेब आजबे यांनी यावेळी बोलतान सांगितले यावेळी राष्ट्रवादीचे काँग्रेसचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे हरिभाऊ दहातोंडे परसराम मराठे संतोष गुंड सिताराम दहातोंडे चेअरमन सेवा सोसायटी विठ्ठल नागरगोजे सरपंच विठ्ठल आडसरे बबन रांजणे मामा ठोंबरे मामा महादेव डोके पप्पू गवळी दिनेश डोके रामकिसन दहातोंडे सतीश कोहक, भास्कर दहातोंडे संतोष शिंदे, बशीर मामू शेख भास्कर कराळे शिवाजी चौबे दादा शिंदे आदित्य जगताप घोडके मामा राज आटोळे बंडू खकाळ, संतोष खकाळ ठोंबरे मामा पप्पू गवळी अमोल ठोंबरे माजी सरपंच फसले सर आजिनाथ फसले मेजर शामराव फसले बबलू शेठ सतीश कोहक मीरा मामू शेख लक्ष्मण दादा फसले अडबले मेजर जुलेखा मिस्तरी विठ्ठल नागरगोजे रावसाहेब दळवी सरपंच सौ कौशल्य फसले सौ सविताआडबले सौ मालक कोहक,सौ अलका अडबले उषा अडबळे,, केशर आडबले, विशाल झांबरे सरपंच संपत झेंडे आबासाहेब परभणे भीमराज परभने संभाजी कोलते उपसरपंच बबलू शेठ गोविंद इथापे अशोक माळी संतोष मुळे मधुकर कोलते अशोक कोलते शिवाजी परभणे बाळासाहेब उचाळे राहुल परभणे दत्तू परभणे भाऊसाहेब परभणे यांच्यासह गणातील कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एल.सी.डी.टिव्ही सेट व शालेय साहित्य देवून केला महेश खकाळ यांचा वाढदिवस साजरा

**कडा । प्रतिनिधी**

तालुक्यातील साबलखेड येथील जि.प.शाळेचे शालेय समिती उपाध्यक्ष काकासाहेब तुकाराम गाडे यांनी सामाजिक उपयोगी कार्य तसेच शिक्षणाची आवड हे डोळ्यासमोर ठेवून त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा साबलखेडच्या विद्यार्थ्यांना महेश काका खकाळ, यांच्या वाढदिवसाच्याचे निमित्त साधून मित्रांच्या हॉटेल धाब्यावरचा खर्चाला फाटा देत विद्यार्थ्यांना २५ हजार रुपये किमतीचे एलसीडी टीव्ही तसेच शालेय साहित्य देऊन वाढदिवस साजरा केला. या उपक्रमामुळे शाळेच्या विद्यार्थ्यांनी महेश काका यांच्या वाढदिवस आपल्या चिमुकल्या अशा आवाजाने हॅपी बर्थडे टू यू म्हणत महेश काका यांना वाढदिवसाच्या




शुभेच्छा देऊन काकासाहेब तुकाराम गाडे यांनी दिलेल्या शालिय उपयोगी साहित्य दिल्या बद्दल त्यांचे आभार मानले. या प्रसंगी साबलखेडचे सरपंच पती शिवाजी बुरगुंले, उपसरपंच शरद काका देसाई, सामाजिक कार्यकर्ते तात्यासाहेब बुरगुंले,शालेय समितीचे अध्यक्ष अमोल देसाई, जाकीर शेख, अल्ताफ शेख, अशोक मुळे, रेहान शेख,उद्योजोक प्रतिक देसाई, तसेच

तान्हाजी कर्डीले, अमोल थेटे,अक्षय गोरे, अमोल सोनवने,ढोबळे,व शाळेचे मुख्याध्यापिका श्रिमती आढाव मॅडम, धांडे मॅडम,सय्यद मॅडम,चिमटे मॅडम,उपस्थित होते.

## प्रधानमंत्री कुसुम योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा- डॉ. वसंत देशमुख

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

भारतीय कृषी कौशल्य परिषद नवी दिल्ली व दीनदयाल शोध संस्थान कृषी विज्ञान केंद्र अंबाजोगाई (डिघोळआंबा) यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री कुसुम योजना जनजागृती कार्यशाळा संपन्न झाली. याप्रसंगी बोलताना डॉ. देशमुख म्हणाले की, जल - कोळसा आदी नैसर्गिक संसाधने यांचे साठे कमी होत असून ऊर्जा निर्मितीसाठी सौर ऊर्जेचा वापर भविष्यकाळात होणे गरजेचे आहे. याकरिता केंद्र शासन शेतकऱ्यांसाठी, शेतकरी उत्पादन कंपन्यांसाठी प्रधानमंत्री कुसुम योजना राबवित असून यामध्ये ॲग्री-होलटाईक (कृषी-सौर विद्युतीकरण), सौर पंप यासारख्या विविध घटकांचा समावेश केला आहे. सध्या शेती पंपसाठी सौर ऊर्जा चा वापर करण्यास शेतकरी बांधवांनी सुरवात केली असून ॲग्री-होलटाईक (कृषी सौर) घटका अंतर्गत 'शेतीजमिनीवर पीक उत्पादनासोबातच सौर ऊर्जा निर्मिती करणे' एक अभिनव दृष्टीकोन ठरत असल्याचे सांगितले.

याप्रसंगी भारतीय कृषि कौशल्य परिषद, नवी दिल्लीचे आशुतोष पाटील यांनी प्रधानमंत्री कुसुम योजनेच्या विविध घटक, त्यासाठीचे पात्रता निकष व आर्थिक ताळेबंद मांडून ही योजना शेतकऱ्यांसाठी फायदेशीर असल्याचे सांगितले.

केंद्राचे कृषी अभियंता प्रमोद रेणापूरकर यांनी कृषी सौर विद्युत निर्मिती घटकांमध्ये सौर ऊर्जा उत्पादन आणि शेतीसाठी जमिनीचा दुहेरी वापर होत असल्याचे सांगून त्याचे वेगवेगळे चार प्रकार व त्यांचे फायदे विषद केले. कृषी सौरकरणामुळे शेतकऱ्यांना शेती उत्पनाबरोबरच विद्युत निर्मितीमधूनही आर्थिक फायदा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. रेनापुरकर म्हणाले की, या प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे शेती मध्ये पीकास लागणाऱ्या पाण्याची गरज कमी भासून जमिनीची धूपेचा वेगही कमी होईल. या शेती पद्धतीमुळे जमिनीचे आरोग्य सुधारणा होऊन पाणी पातळी वाढण्यास मदत होते असे त्यांनी सांगितले. कार्यशाळेस जिल्ह्यातील सात तालुक्यातून शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून योजनेची माहिती घेतली. या प्रसंगी टी.आर.आय.एफ. संस्थानचे प्रतिनिधी तेजकरण चरण, सुधाकर व ग्रामउर्जा संस्थेचे दादासाहेब गायकवाड यांची उपस्थिती होती.

## एस.सी.,एसटी वर्गीकरणास विरोधासह विविध मागण्यांसाठी भारतीय बौद्ध महासभेचा भारत बंदमध्ये सहभाग; राष्ट्रपती व प्रधानमंत्री यांना दिले निवेदन!

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

भारतातील अनेक महापुरुषांनी सामाजिक ऐक्य राखण्यासाठी जनजागृती केली. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मोठ्या कष्टाने जाती तोडल्या, विविध जाती, त्यांचे सामाजिक मागासलेपण, शैक्षणिक मागासलेपण अशा वर्गवारी तयार करून त्यांचे सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण नष्ट करण्यासाठी आरक्षण दिले आणि सत्तेत वाटा दिला. आरक्षण आर्थिक प्रगतीसाठी नाही तर वंचितांना समान संधी आहे. याला संविधान सभेची संवैधानिक मान्यता मिळाली, त्यामुळे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकांमध्ये सामाजिक ऐक्य निर्माण झाले.

तथापि, माननीय सर्वोच्च न्यायालयाने ०१/०८/२०२४ रोजी घटनाविरोधी निकाल दिला आहे जो अनुसूचित जाती-जमातींच्या एकतेला तडा देणारा आहे . घटनेच्या मूळ संकल्पनेचा विचार न करता,या प्रवर्गामध्ये उप-श्रेणी व क्रिमी लेयर निर्माण करणे अन्यायकारक आहे. त्यामुळे अनुसूचित जाती-जमातींतर्गत जातीचे गट तयार झाल्यास त्यांना रोस्टरनुसार योग्य प्रतिनिधित्व मिळू शकणार नाही. वैकल्पिकरित्या, आरक्षण रद्द केले जाईल. यासाठी भीमराव यशवंतराव आंबेडकर (राष्ट्रीय ट्रस्टी/राष्ट्रीय कार्याध्यक्ष ) भारतीय बौद्ध महासभा यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली बी.बी.धन्वे( अध्यक्ष) भारतीय बौद्ध महासभा बीड जिल्हा (पूर्व), डॉ. संतोष बोबडे (सरचिटणीस), प्रा. एस.बी. शिंदे (कोषाध्यक्ष),एस. बी. मोरे(उपाध्यक्ष संस्कार), कमलताई डोंगरे, एस.एस.सोनवणे,डॉ. एस.जे.महाळंगीकर,एस.एन.वाघमारे,प्रा.डॉ. आर.डी.आचार्य,शोभाताई भोजने ,कविताताई सिरसट,एन.बी. राजभोज, के. व्ही. साळवे,



रामजी कासारे ,आर.डी. जोगदंड,पंकज भटकर,एम. वाय. काळे,भीमराव सिरसाट,बी.व्ही. सातपुते,ए.एन. पटेकर,एम.एम.कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हाधिकारी कार्यालया समोर आंदोलन करून उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत राष्ट्रपती व प्रधानमंत्री यांना खालील विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. ०१) केंद्र सरकारने संसदेत अध्यादेश काढून, अनुसूचित जाती-जमातींच्या प्रवर्गातील प्रस्तावित जातींचे उपवर्गीकरण आणि क्रिमीलेअरचा निर्णय केंद्र आणि राज्य सरकारांनी अंमलात आणू नये. ०२) केंद्र सरकारने एससी आणि एसटी यांच्या आरक्षणाचा एकच कायदा करावा व तो शेड्यूल ९ मध्ये समाविष्ट करावा, जेणेकरून कोणतेही न्यायालय त्यामध्ये हस्तक्षेप करू शकणार नाही. ०३) केंद्र सरकारने सर्व जातींची जनगणना करून त्यांच्या लोकसंख्येनुसार आरक्षणाची तरतूद करावी. ०४) खाजगी विद्यापीठे, खाजगी आस्थापने आणि कंत्राटी भरतीमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी आरक्षण लागू करावे. ०५) मा. उच्च न्यायालय आणि मा. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती सध्याच्या ''कॉलेजियम'' प्रणालीद्वारे न करता ''न्यायिक नियुक्ती आयोग'' स्थापन करून आणि परीक्षा घेऊनच करावी.इत्यादी मागण्याचे निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनावर देविदास निवृत्ती घोबाळे,कासारे राहुल,अमर कांबळे,सुकेशनी माधव काळे,मिलिंद मस्के, गोविद मस्के, ॲड प्रमोद कासारे,ॲड गोरे डी.आर, ॲड एस के चव्हाण,जोगदंड रखमाजी,प्रा. राहुल सुरवसे,संजिवनी धन्वे,रत्नमाला तरकसे,सुधाताई जोगदंड, पूष्पाताई गायकवाड,भावना कांबळे, जयश्री श्रीराम गावडे,मंजुषा दादासाहेब कसबे,विद्या आत्माराम गावडे,ज्योती रवी कसबे,इंदू जोगदंड,सुमन मस्के,संध्या बाळासाहेब शिंदे,सुमन दोनगहू,त्रिशाला कांबळे,छाया गोपीनाथ सरवदे, विमलबाई योगीराज मस्के,शामल गोविद मस्के,कुसुम शिवाजी सरवदे,मीना अरुण गायसमुद्रे,सुमन विकास होके,संगिता संजय होके,त्रिशला छगन शिंदे, माया किरण हजारे ,छाया गौतम कसबे,कमलबाई ढवारे,लक्ष्मी ठोके,सिताबाई तरकसे,कल्पना वाघचौरे,मिरा शिनगारे,सृष्टी गायकवाड, यांच्या सह इतरांच्या सह्या आहेत.या आंदोलनात शेकडो लोक सामिल झाले होते.

## शाळकरी मुलींची छेडछाड;आष्टी पोलिसांत गुन्हा दाखल

**आष्टी । प्रतिनिधी**

शहरातील जिल्हा परिषद कन्या शाळा सुटल्यानंतर रस्त्याच्या कडेला आडवूण शाळकरी मुलींची छेड काढणार्यांच्या विरोधात आष्टी पोलिस ठाण्यात पीडित मुलीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला आहे.सदरील प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला आहे.

याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, आष्टी शहरातील जिल्हा परिषद कन्या प्रशाला (मुलींची) शाळा असून या ठिकाणी शहरासह तालुक्यातील हजारो मुली शिक्षण घेत आहेत.सदरील शाळा सुटल्यानंतर आज शुक्रवार (दिनांक २३) दुपारी चार वाजता खडकत रोडवरील इयत्ता आठवीत शिकणाऱ्या दोन मुलींना अडवून त्यांची छेड काढण्याचा प्रकार घडला आहे.सदरील मुलगी घाबरलेल्या अवस्थेत पुन्हा शाळेत जाऊन घडलेला प्रकार मुख्याध्यापकांना सांगितला.शाळेचे मुख्याध्यापक यांनी संबंधित पालकांना बोलून पोलीस स्टेशन गाठत संपूर्ण हकीगत सांगतली.याबाबत आष्टी पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध पीडित मुलीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी या आरोपी खडकत रोडवरील सिटी सीसीटीव्ही कॅमेरात प्रकार कैद झाला असल्याचे बोलले जात आहे. आता यावर पोलीस आपला खाकी दाखवतात का? आरोपीला पकडतात का? हे येणारा काळ सांगेल.

पालकांनी जागरूक व्हावे

सध्या बलात्काराच्या व छेडछाडीच्या घटना मोठ्या प्रमाणावर घडत आहेत.अजून बदलापूर सारखी भयान घटना समोर असतांनाच आष्टी सारख्या छोट्या शहरातही छेडछाडीचे प्रकार भयानक आहे.आशा प्रकाराला आळा घालण्यासाठी नगर पंचायत आष्टी शहरामध्ये दोन ठिकाणी तक्रार पेटी ठेवणार आहे.तसेच पालकांनीही जागरुक राहणे गरजेचे आहे.

-जिया बेग, नगराध्यक्ष न.प.आष्टी

पान ६ वरून

### बीड जिल्ह्यातील साडेतीनशे

लागेल. हे माहीत असतानाही याकडे अधिकाऱ्याचे दुर्लक्ष होत आहे .कर्मचाऱ्यांचे केवळ खुर्च्या उबवण्याचे काम चालू आहे. जिल्हा परिषदेमध्ये स्वच्छ भारत मिशन साठी स्वतंत्र उपमुख्य कार्यकारी अधिकारी आहेत .त्यांना दुसऱ्या कुठल्याही कामाचा तान नाही. तरी त्यांच्याकडून ही सार्वजनिक हिताची कामे होत नाहीत. याचे नेमके कारण काय हे अद्यापही समजले नाही. सार्वजनिक हिताच्या कामात अधिकारी एवढे नकारात्मक का असतात या मागचे गोड बंगाल कळत नाही. लोकांच्या व्यवस्थेसाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांना पगार मिळतो. मात्र लोकांच्या हिताची कामे होताना दिसत नाहीत .मग केवळ खुर्च्या उबवण्यासाठीच अधिकारी आणि कर्मचारी आहेत काय? असा संतप्त सवाल आता पालकही करू लागले आहेत. याची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेऊन येत्या महिनाभरात सार्वजनिक हिताच्या शाळेतील शौचालयाचा प्रश्न मार्गी लागला पाहिजे. अशी अपेक्षा पालक आणि ग्रामस्थातून होत आहे.

### खुल्या प्रवर्गाच्या घरकुलासाठी

राज्य व्यवस्थापक कक्ष ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडून ठरवून दिलेले बांधकाम पूर्ण झाल्याची खात्री झाल्यानंतर सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे निधी देण्यात येतो हे सर्व शासन स्तरावर चालत येत असले तरी माजलगांव तालुक्यात किट्टी ग्रामपंचायत मध्ये २०१९ पासून खुल्या प्रवर्गासाठी येथील ग्रामपंचायत कार्यालयाने अन्याय केल्या मुळे त्याला वाचा फोडण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यां वैशाली आगे,रविना आगे आणि रेवती आगे यांच्या नेतृत्वाखाली गावातील जवळपास ५०० महिलांनी ग्राम पंचायत कार्यालय किट्टी आडगांव येथे दिनांक २२ वार गुरूवारी ग्रामसेवक महेश गेंदले आणि सरपंच रूक्मानंद खेजे यांना लेखी निवेदन दिले असून त्या निवेदनात ३० ऑगस्ट पर्यंत ग्रामसभा घेऊन घरकुल मंजूरी करून घ्या अन्यथा दिनांक ५ सप्टेंबर पासून ठिय्या आंदोलन (अमरण उपोषण )करणार असून काही अनुचित प्रकार घडल्यास सर्वस्वी जवाबदारी ग्रामपंचायतची राहिल असा इशारा महिलांनी दिला असल्याची माहिती वैशाली आगे यांनी दिली.

पान ६ वरून

### शिवसैनिकांनो, बीड विधानसभेवर

जिम्मेदारी आहे अनिलदादा यांना ताकद द्यायची. याबरोबरच बीड विधानसभेवर शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी दंड थोपटून मैदानात उतरा, मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी महिलांसाठी राबविलेल्या लाडकी बहीण योजनेचा लाभ गावागावात पोहचवा, मुख्यमंत्री शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागा असे शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख बाप्पुसाहेब मोरे यांनी पदाधिकारी शिवसैनिकांना आदेशित केले. शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड येथे काल दु. १.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख बाप्पुसाहेब मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीकरिता शिवसेना युवासेना पदाधिकारी, महिला आघाडी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीचे प्रास्ताविक उप जिल्हप्रमुख संतोष जाधव यांनी केले तर शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांनी पदाधिकाऱ्यांना कार्यपद्धती बाबत सूचना मार्गदर्शन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शहर प्रमुख नंदकिशोर पिंगळे यांनी केले.

### अल्पवयीन मुलीवरील अत्याचार

सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने बसवावेत व नियमितपणे हे कॅमेरे कार्यान्वित राहतील याची खबरदारी घेऊन फुटेज तपासले पाहिजेत, शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी चारित्र्यांची पडताळणी करावी, मुलींच्या काळजीसाठी महिला कर्मचारी नेमले पाहिजेत. याशिवाय पालक विद्यार्थी यांच्यासाठी तक्रार पेटीची व्यवस्था केली जावी अशा महत्वपूर्ण उपाय योजना शासन निर्णयाद्वारे राज्य शासनाने सुचवलेल्या आहेत. शिक्षण संस्थाचालकांनी या निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. असे आवाहन भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे

### मुख्यमंत्री व पालकमंत्र्यांकडून

मा. आ. भिमराव धोंडे यांनी गांभीर्याने दखल घेत

शासनाकडे मागणी केली होती तसेच वर्तमानपत्रांतून बातम्या प्रसिद्ध झाल्या. सोशल मीडियावरुन सर्वत्र व्हायरल झाल्या होत्या. मा. आ. भीमराव धोंडे यांनी ई पीक पाहणीची अट रद्द करून सरसकट अनुदान द्यावे अशी मागणी केली होती. गेल्या आठ दिवसापासून ही मागणी सर्वत्र वर्तमानपत्रांमध्ये गाजत आहे. दोन दिवसांपूर्वी परळी येथे कृषी महोत्सवाच्या निमित्ताने केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री धनंजय मुंडे, लोकनेत्या आ. पंकजाताई मुंडे उपस्थित होत्या त्या अनुषंगाने पालकमंत्री धनंजय मुंडे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ई पिक पाहणीची अट रद्द करण्याची घोषणा केली.

त्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांना आता सरसकट अनुदान मिळणार आहे .सर्वप्रथम ही मागणी मा. आ. भीमराव धोंडे यांनीच लावून धरल्याने ती पूर्णत्वास गेली आहे त्यामुळे जिल्ह्यातील हजारो शेतकरी समाधानी झाले आहेत. जनसंपर्क अभियान दौऱ्यात अनेक शेतकऱ्यांनी हि मागणी केली होती अशा शेतकऱ्यांनी मा. आ. भीमराव धोंडे यांना धन्यवाद दिले आहेत.

### मोकाट जनावराचा बंदोबस्त

असेल असे निवेदन आज मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आले यावेळी

माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आप सय्यद सादेक शहराध्यक्ष रफिक पठाण अल्पसंख्याक विभाग रामभाऊ शेरकर मीडिया प्रमुख आजम खान तालुका उपाध्यक्ष सखाराम बेगडे दत्ता सुरवसे तालुका संघटन मंत्री रामेश्वर गव्हाणे प्रवीणाने आनेराव इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

### ओबीसी समाज प्रस्थापितांच्या

संवाद साधला. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, ओबीसी आरक्षण बचावसाठी लढणारे नेते लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्या लढ्याला बळ देण्यासाठी तसेच गावागावात जाऊन जनजागृती करण्यासंदर्भात गेवराई तालुका ओबीसी आरक्षण बचाव समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यामध्ये गेवराई मतदारसंघात दि.१७ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट दरम्यान ओबीसी आरक्षण पदयात्रा काढण्याचे ठरवले, त्यानुसार ही ओबीसी आरक्षण बचाव यात्रा सुरु आहे. या यात्रेत आम्ही देखील सहभागी होऊन समाजाप्रती झोकून काम करत होतो. दरम्यान आम्ही आत्तापर्यंत समाजसेवेच्या माध्यमातून केलेल्या कामांमुळे सदरील पदयात्रेत जनतेचा आम्हाला प्रतिसाद मिळत होता, हे पाहून पदयात्रेतील सुघोष मुंडे, पि.टी.चव्हाण व परमेश्वर वाघमोडे यांच्या डोळ्यात खुपल्याने व या ओबीसी नेत्यांना आपली दुकानदारी बंद पडण्याची भिती वाटू लागल्याने त्यांनी आम्हाला डावलण्याचे काम सुरू केले. तसेच ओबीसी समाजाच्या बैठकीतून समाजासाठी रस्त्यावर उतरुन आंदोलन करणारे भारत देवकते सह अन्य एका जणाला बाहेर काढून अपमानास्पद वागणूक दिली गेली, जाणीवपूर्वक पोस्टरवर काहींची नावे वगळून या तिघांकडून त्यांच्या स्वार्थासाठी ओबीसी आरक्षण बचाव पदयात्रेत राजकारण केले जात असल्याचा आरोप करतानाच ओबीसी नेते लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्या नियोजित दौऱ्याबाबत देखील चुकीची माहिती देऊन संभ्रम निर्माण केला जात असल्याचे मस्के यांनी सांगितले. दरम्यान आम्हाला पदयात्रेतून डावल्याने आम्ही पदयात्रेत सहभागी होणार नाही. त्यामुळे ओबीसी, दलित, अल्पसंख्याक समाजाने आमच्याबाबत कोणताही गैरसमज निर्माण करु नये, आम्ही कायम आपल्या सोबत असणार आहोत. ओबीसी समाज सुज्ञ आहे, ओबीसीबरोबरच दलित, अल्पसंख्याक यांच्यासाठी आम्ही निस्वार्थीपणे काम करत राहू, कोणाकडून आम्हाला डावलले जात आहे, म्हणून आम्ही न डगमगता, न घाबरता ओबीसी नेते तथा आंदोलक लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली समाजासाठी काम करतच राहू असा विश्वास मयुरीताई मस्के-खेडकर व बाळासाहेब मस्के यांनी व्यक्त करतानाच मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण मिळालेच पाहिजे ही देखील मागणी आम्ही ओबीसी आरक्षण बचाव पदयात्रेतून करत होतो, असे त्यांनी सांगितले.

# रब्बीत हजार एकरावर मसालावर्गीय पिकांच्या लागवडीचा प्रस्ताव

अकोला : यंदाच्या रब्बी हंगामात जिल्ह्यात मसालावर्गीय पिकांची सुमारे हजार एकरावर लागवड करण्याचे प्रस्तावित आहे. ओवा, काळे जिरे, सोप अशा विविध पिकांची लागवड करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. यासाठीचा जिल्हा नियोजन समितीच्या मंजुरीसाठी प्रस्ताव देण्यात आला असून मंजुरी मिळाल्यास जिल्ह्यात एक नवीन सुरुवात होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

कृषी विभाग, आत्मा यंत्रणा व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी नावीन्यपूर्ण उपक्रम म्हणून रब्बीत किमान हजार एकरावर मसालावर्गीय पिकांच्या लागवडीचा प्रस्ताव तयार केला आहे. अकोला जिल्ह्यात कोरडवाहू क्षेत्र अधिक असून पावसाच्या पाण्यावरच खरीप व त्यानंतर रब्बी हंगामाचे भवितव्य अवलंबून राहते. सिंचनाची सोय नसलेल्या शेतकऱ्यांना रब्बीमध्ये पिके घेणे कठीण होते. त्यातही वर्षानुवर्षे रब्बीत हरभरा, गहू ही दोनच पिके घेण्याचा कल अधिक राहलेला आहे. या पिकांवर किडरोगांचा प्रादुर्भाव, कमी उत्पादकता, खर्चात वाढ, अशा समस्या वर्षानुवर्षे बिकट होत आहेत. अशा स्थितीत शेतकऱ्यांना पर्याय म्हणून व हवामान अनुकूल



पीकपद्धतीच्या उद्देशाने यंदा रब्बी हंगामात मसालावर्गीय ओवा, काळे जिरे, सोप अशा पिकांची लागवड करण्याचा पर्याय निर्माण केल्या जात आहे. अकोला जिल्ह्यात तेल्हारा, अकोट तालुक्यांतील शेतकरी वर्षानुवर्षे ओव्याची लागवड करीत असतात. बाजारपेठेत ओव्याला किमान १० हजारांच्या पुढेच दर मिळतो. शिवाय तीन ते पाच क्विंटलपर्यंत उत्पादकता आहे. एकरी आठ ते नऊ हजार रुपयेच खर्च लागतो. महत्त्वाचे म्हणजे या पिकाला रानटी प्राण्यांचा कुठलाही त्रास नसतो.

कमी पाण्यात, कमी खर्चात येणारी ही मसालावर्गीय पिके असून प्रकल्पाला मंजुरी मिळाली तर याच रब्बीत लागवडही होईल. शेतकऱ्यांना अजमेरच्या राष्ट्रीय बीज मसाले संशोधन केंद्राने विकसित केलेल्या वाणाचे बियाणे पुरवले जाईल.

कमी खर्चात अधिक उत्पादन

या प्रस्तावाचे जिल्हाधिकारी अजित कुंभार यांना सविस्तर सादरीकरण देण्यात आलेले आहे. अशी पीकपद्धती शेतकऱ्यांना कमी खर्चात अधिक उत्पादन व उत्पन्न देणारी आहे. सध्या जिल्ह्यात दोन ते अडीच हजार एकरांवर शेतकरी आपापल्या स्तरावरून ओवा व इतर पिकांची पेरणी करीत असतात. परंतु ही लागवड प्रामुख्याने तेल्हारा व अकोट या दोन तालुक्यांपुरतीच मर्यादीत आहे. प्रस्तावाला मंजुरी मिळाली तर जिल्ह्यातील उर्वरित तालुक्यांमध्येही शेतकऱ्यांना या पिकांच्या लागवडीत सहभागी करून घेतले जाऊ शकेल. कमी खर्चात चांगले उत्पन्न मिळाले तर हेच शेतकरी पुढील हंगामात स्वतःहून लागवड करतील. या पिकांचे क्षेत्र आपोआप वाढीला लागू शकते. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी या प्रस्तावाला जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून पाठबळ देण्याची शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाची बाब ठरेल.

## डुरम गव्हाची 'पुसा गौरव' जात फायद्याची



डुरम गव्हाची पुसा गौरव (एचआय ८८४०) ही नवीन प्रसिद्ध झालेली जात भारतातील विशेषतः द्वीपकल्पीय आणि मध्यवर्ती प्रदेशात गव्हाच्या लागवडीत क्रांती घडवून आणू शकते. उच्च उत्पादन, हवामानातील लवचिकता आणि पौष्टिक गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करून विकसित केलेली पुसा गौरव ही जात धान्य भरण्याच्या अवस्थेत मर्यादित पाण्याची उपलब्धता आणि उच्च तापमान यासारख्या आव्हानांना तोंड देऊ शकते.

पुसा गौरवची मुख्य वैशिष्ट्ये आणि फायदे : मर्यादित सिंचन परिस्थितीत या जातीचे सरासरी धान्य उत्पादन ३०.२ क्विंटल प्रति हेक्टर असून पाण्याच्या योग्य उपलब्धतेत या वाणाचे प्रति हेक्टर उत्पादन ३९.९ क्विंटल प्रति हेक्टर पर्यंत जाते. पुसा गौरव हे चेक वाणांपेक्षा २.४ ते १३.१ टक्के जास्त उत्पादन देते. मध्यम उंची असलेल्या या वाणाची झाडे बळकट असून वेगवेगळ्या पाण्याच्या परिस्थितीतही ते तग धरून राहू शकते. ही जात काळ्या आणि तपकिरी तांबेरा या गहू पिकाच्या उत्पादनावर परिणाम करणाऱ्या रोगांना प्रतिकारक आहे, त्यामुळे पिकांचे आरोग्य चांगले राखून उच्च उत्पादनाची हमी देते. पुसा गौरव ही जात कमी उष्णता, आणि दुष्काळी परिस्थिती, उच्च तापमान आणि पाण्याची टंचाई यासारख्या हवामानाशी संबंधित आव्हानांचा योग्य प्रकारे सामना करू शकते. त्यामुळे या भागातील शेतकर्यांसाठी हा एक आदर्श पर्याय आहे. पुसा गौरव ही बायोफोर्टिफाइड गव्हाची जात असून झिंक (४१.१ पीपीएम), लोह (३८.५ पीपीएम), आणि प्रथिने सामग्री (१२%) यासह आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध आहे. यामुळे उच्च उत्पादन सोबतच ग्राहकांसाठी पोषकदृष्ट्या उत्कृष्ट पर्याय देखील बनते. उच्च-गुणवत्तेचा पास्ता तयार करण्यासाठी हा वाण आदर्श आहे, त्याच्या उच्च पिवळ्या रंगद्रव्याचे प्रमाण (८.१) आणि धान्य कडकपणा निर्देशांक (९५) मुळे. यामध्ये ४०.५ मिली एसडीएस मूल्यासह उत्कृष्ट चपाती बनवण्याचे गुण देखील आहेत.

कृषिविषयक वैशिष्ट्ये : वेळेवर पेरणी, मर्यादित सिंचन परिस्थितीसाठी ही जात योग्य आहे. द्वीपकल्पीय आणि मध्य भारतात लागवडीसाठी सर्वोत्तम अनुकूल जात. हे काढणीस लवकर तयार होणारे वाण आहे. ११०-११५ दिवसात परिपक्व होते. या वाणाची उंची ८०-८५ सेमी असल्यामुळे पिकाला लवचिकता आणि मजबूतपणामध्ये प्रदान करते. १००० धान्याचे वजन ४७ ग्रॅम आहे जे त्याच्या चांगल्या धान्याचा आकार आणि गुणवत्तेचे सूचक आहे.

## भारतातून मलेशियाला २०० हजार टन गैर-बासमती तांदूळ निर्यात करण्यास परवानगी

नवी दिल्ली : सरकारने मलेशियाला गैर- बासमती तांदूळ निर्यात करण्यास परवानगी दिलेली आहे. नॅशनल कोऑपरेटिव्ह एक्सपोर्ट लिमिटेडमार्फत सरकारने मलेशियाला दोन लाख टन बिगर बासमती पांढरा तांदूळ निर्यात करण्यास परवानगी दिली आहे.

देशांतर्गत पुरवठ्याला चालना देण्यासाठी २० जुलै २०२३ पासून गैर-बासमती पांढऱ्या तांदळाच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आली असली तरी, विनंतीनुसार काही देशांना त्यांच्या अन्न सुरक्षेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सरकारने दिलेल्या परवानगीच्या आधारावर निर्यातीस परवानगी दिली जाते. ''एनसीईएलद्वारे मलेशियाला २,००,००० मेट्रिक टन गैर-बासमती पांढरा तांदूळ निर्यात करण्याची परवानगी आहे,'' असे परकीय व्यापार महासंचालनालयाने अधिसूचनेत म्हटले आहे. भारताने याआधी नेपाळ, कॅमेरून, कोटे डी'आयव्होर, गिनी, मलेशिया, फिलीपिन्स आणि सेशेल्स सारख्या देशांमध्ये या निर्यातीला परवानगी दिली आहे. या अगोदर लोकसभा निवडणुकीच्या काळात म्हणजे मे महिन्यात मॉरिशसला १४ हजार टन बिगर बासमती तांदळाची निर्यात करण्याला मंजूरी देण्यात आली होती. ही एक बहु-राज्य सहकारी संस्था आहे. जिला देशातील काही आघाडीच्या सहकारी संस्थांद्वारा संयुक्तपणे प्रोत्साहन दिले जाते, म्हणजे गुजरात कोऑपरेटिव्ह मिल्क मार्केटिंग फेडरेशन, इंडियन फार्मर्स फर्टिलायझर कोऑपरेटिव्ह लिमिटेड, कृषक भारती कोऑपरेटिव्ह लिमिटेड आणि मार्केटिंग फेडरेशन ऑफ इंडिया लिमिटेड राष्ट्रीय कृषी सहकारी संस्था म्हणून ओळखले जाते. तांदळाच्या किमतीतील दरवाढ रोखण्यासाठी तसेच उत्पादनात घट होण्याची शक्यता असल्यास सरकार वेळोवेळी पाऊले उचलत आलेली आहे. नॉन बासमती तांदूळ निर्यात बंदी हे त्यातलेच एक उद्देश आहे. यावेळी देशभरात झालेला चांगला मॉन्सून यामुळे तांदळाचे उत्पादन वाढण्याचे अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे तांदूळ निर्यात बंदी पूर्णपणे हटवण्याची शक्यता नाकारता येत नाही.



## गवती चहाची लागवड

गवती चहा ही मूलतः आफ्रिका, युरोप, आशिया व ऑस्ट्रेलिया या खंडांतील उष्णकटिबंधीय व समशीतोष्ण प्रदेशांतील एक तृणवर्गीय वनस्पती आहे. हे एक बारमाही प्रकारातील सुवासिक गवत आहे. हे महाराष्ट्र, कर्नाटक आणि केरळात मुबलक उगवते. चहाला चव येण्यासाठी थंडीच्या काळात याच्या लांब पानाचे बारीक तुकडे करून चहाबरोबर किंवा चहाशिवाय उकळतात.

जमीन व हवामान : गवती चहासाठी निचरा होणारी, मध्यम काळी, पोयट्याची किंवा रेताड जमीन योग्य असते. या गवताच्या कठीणपणामुळे विविध प्रकारच्या हलक्या ते भारी जमिनीत हे पीक घेता येते. तसेच, लाल व वालुकामय जमिनीत हे पीक चांगले येते. कारण त्यामध्ये मुळे उत्तम वाढतात, त्यातील सिट्रॉलचे प्रमाण वाढते.कॅल्शियमयुक्त जमिनित, तसेच ज्या ठिकाणी पाणी साचून त्याचा निचरा होत नाही, तिथे हे पीक घेवू नये. गवती चहाला उबदार व उष्ण हवामान मानवते. भरपूर सूर्यप्रकाश व सम प्रमाणातपडणारा पाऊस गवती चहाच्या वाढीस पोषक असतो.

सुधारित जाती : लागवडीसाठी सीकेपी-२५, ओडी-१९, ओडी-२३, ओडी-२५,ओडी-४४०, आरआरएल-१६, जीआरएल-१,प्रगती, प्रमाण, कावेरी, कृष्णा, चिरहरित व निमाया जातींची निवड करावी. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरीने सीकेपी-२५ या जातीची महाराष्ट्रासाठी शिफारस केलेली आहे. या जातीची पाने गर्द हिरव्या रंगाची, कमी रुंदीची, पाण्याचा ताण सहन करणारी व त्याचप्रमाणे सिट्रॉलचे प्रमाण जास्त असणारी आहे.

खत व्यवस्थापन : गवती चहाचे पीक एकदा



लागवड केल्यानंतर ४-५ वर्षांपर्यंत जमिनीत रहाते. त्यासाठी लागवडी अगोदर चांगली मशागत करावी. जमिनीची उभी व आडवी नांगरट करून २-३ कुळवाच्या पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवणीच्या वेळी एकरी ४-५ टन शेणखत किंवा कंपोस्ट खत मिसळावे. गवती चहाची लागवड पाण्याची उपलब्धता असल्यास वर्षभर करता येते.लागवड बिया किंवा गवती चहाच्या आलेल्या नवीन फुटव्यापासून करता येते. फुटव्यापासून केलेली लागवडीची वाढ जोमाने होते. गवती चहाला एका वर्षानंतर अनेक फुटवे येतात. असे फुटवे कुदळीने खणून काढावेत. चांगल्या रोगविरहित फुटव्यांची शेतात ६० बाय ६० सें.मी.किंवा ७५ बाय ६० सें.मी. किंवा ७५ बाय ७५ सें.मी. अंतरावर लागवड करावी.फुटव्यांची लागवड करण्यापूर्वी २५० ग्रॅम अ‍ॅझोटोबॅक्टर हे जीवाणू संवर्धक अर्धा लिटर पाण्यात मिसळून त्याचे मिश्रण तयार करावे. हे मिश्रण पाण्यात टाकून त्यात रोपांची मुळे बुडवून घ्यावीत. लागवड करताना जमिनीत पुरेसे पाणी आहे अशी खात्री करून घ्यावी.

अन्यद्रव्ये व पाणी व्यवस्थापन : या पिकासाठी माती परीक्षणानुसार खतांचा वापर करावा. लागवडीच्या वेळी एकरी २० किलो नत्र, २० किलो स्फुरद, २० किलो पालाश द्यावे. प्रत्येक काढणीनंतर एकरी२० किलो नत्राचा हप्ता द्यावा व ताबडतोब पाणी द्यावे. जमिनीचा मगदूर, पिकाचे वय व ऋतुमानानुसार पाणी व्यवस्थापन करावे. लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे.हिवाळ्यात १२ ते १५ दिवसांनी व उन्हाळ्यात ८ ते १० दिवसांनी पाणी द्यावे. उन्हाळ्यात पाण्याची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. पाण्याचा ताण बसल्यास तेलाचा उतारा कमी मिळण्याची शक्यता असते. पावसाळ्यात आवश्यकता असल्यास पाणी द्यावे. जमिनीत पाणी साठून राहिल्यास पिकाच्या वाढीवर अनिष्ट परिणाम होतो.

पीक संरक्षण : 'करपा'या रोगात पानांच्या कडांना व टोकांवर लालसर काळे ठिपके दिसून येतात. 'गवत्या' या रोगात वनस्पतीची वाढ खुंटते व गवतासारखी दाट वाढ होते. 'काणी' नावाच्या रोगात पानांवर काजळीसारखी भुकटी तयार होते तर 'तंबोरा' या रोगाची लागण झाल्यावर पानांवर लालसर ठिपके आढळून येतात. नंतर हे ठिपके फुटून नारंगी पावडर बाहेर पडते. बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव पावसाळ्यात जास्त आढळतो. वेळोवेळी काळजीपूर्वक निरिक्षण करून शिफारशींनुसार रासायनिक औषधांच्या फवारण्या घ्याव्यात.

कापणी व उत्पन्न : लागवडीनंतर पहिली कापणी ५ ते ६ महिन्यांनी येते. नंतरच्या सर्व कापण्या २ ते ३ महिन्यांनी शक्यतो फुलोऱ्याआधी कराव्यात. या पिकाची कापणी धारदार विळ्याच्या साहाय्याने जमिनीपासून १५ ते २० सें.मी. अंतरावर करावी. कापणी केल्यानंतर आलेला पाला वजन करून घ्यावा व १ दिवस सावलीत वाळवून तेल काढण्यासाठी वापरावा. तेलांचे प्रमाण व प्रत कापणीची वेळ व पक्वता यावर अवलंबून असते. फुटव्याला साधारणतः पूर्ण वाढ झालेली ५ ते ६ पाने व फुटव्यांची उंची साधारणतः ३ ते ४ फूट असलेली अवस्था पिकाच्या कापणीस योग्य आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

७९ : ७९ई.पुर्व : इटलीतील माउंट व्हेसुव्हियस ज्वालामुखीचा उद्रेक. पॉम्पेई, हर्क्युलेनियम स्टेबी ही शहरे राखेखाली दडपली जाऊन नष्ट.
१४५६ : जर्मनीतील मेन्झ येथे जोहान्स गुटेनबर्ग यांनी बायबल ग्रंथाच्या छपाई काम पूर्ण केलं.
१६०८ : ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीचा पहिला प्रतिनिधी सुरत येथे दाखल झाला.
१६९० : कोलकाता शहराची स्थापना.
१६९९ : ईस्ट इंडिया कंपनीने विकत घेतलेल्या कोलकाता शहराला प्रेसिडेंसी शहर म्हणून विकसित करण्यास सुरुवात केली तेव्हा त्यांनी त्या शहराचे नाव बदलून कलकत्ता असे ठेवले.
१८७५ : कॅप्टन मॅथ्यू व्हेब इंग्लिश खाडी पोहणारे पहिला व्यक्ती ठरले.
१८९१ : थॉमस अल्वा एडिसनने चलचित्र कॅमेर्याचे पेटंट घेतले.
१९५० : एडिथ सॅम्पसन हा संयुक्त राष्ट्रात जाणारा पहिला कृष्णवर्णीय अमेरिकन प्रतिनिधी ठरला.
१९३६ : ऑस्ट्रेलियन अंटार्क्टिक प्रदेश तयार करण्यात आला.
१९६६ : रशियन बनावटीचे लूना-११ हे मानवविरहित यान चांद्रमोहिमेवर निघाले
१९६९ : भारतीय राजकारणी नेते वी. वी. गिरी यांची भारताच्या राष्ट्रपती पदी निवड करण्यात आली. ते भारताचे चौथे राष्ट्रपती होते.
१९७४ : साली श्रीमती इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात काँग्रेस नेता फखरुद्दीन अली अहमद यांची भारताच्या पाचव्या राष्ट्रपती पदी नियुक्ती करण्यात आली.
१९९१ : युक्रेनने स्वत:ला (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र घोषित केले.
१९९५ : मायक्रोसॉफ्टने विंडोज ९५ ही संगणकप्रणाली प्रकाशित केली.
१९९८ : एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका या जगप्रसिद्ध विश्वकोशाच्या आयातीवर भारत सरकारने बंदी घातली.
२००१ : सरोद वादक अमजद अली खान यांना मध्य प्रदेश सरकारचातानसेन पुरस्कार जाहीर.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३३ : गुजराथी लेखक समाजसुधारक नर्मदाशंकर दवे ऊर्फ नर्मद यांचा जन्म. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १८८६)
१८७२ : केसरी वृत्तपत्राचे संपादक तसेच कायदेमंडळाचे सभासद न. चिं. केळकर यांचा जन्म. (मृत्यू: १४ ऑक्टोबर १९४७)
१८८० : निरक्षर पण प्रतिभावान कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचा जन्म. (मृत्यू: ३ डिसेंबर १९५१)
१८८८ : स्वतंत्र भारतातील मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री बाळ गंगाधर खेर यांचा जन्म. (मृत्यू: ८ मार्च १९५७)
१८८८ : मार्टिन बेकर एरिक कंपनी चे सहसंस्थापक वेलेंटाइन बेकर यांचा जन्म. (मृत्यू: १२ सप्टेंबर १९४२)
१९०८ : क्रांतिकारक शिवराम हरी राजगुरू यांचा जन्म. (मृत्यू: २३ मार्च १९३१)
१९१७ : किराणा घराण्याचे गायक पं. बसवराज राजगुरू यांचा जन्म.
१९१८ : केन्द्रीय परराष्ट्रमंत्री सिकंदर बख्त यांचा जन्म. (मृत्यू: २३ फेब्रुवारी २००४)
१९२० : पद्मश्री व पद्मभूषण पुरस्कार सन्मानित हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील किराणा घराण्याचे प्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. बसवराज राजगुरू यांचा जन्मदिन.
१९२७ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ हॅरी मार्कोवित्झ यांचा जन्म.
१९२७ : भारतीय अभिनेत्री आणि निर्मात्या अंजली देवी यांचा जन्म.
१९२९ : यासर अराफत नोबेल पारितोषिक विजेते पॅलेस्टाईनचे नेते (मृत्यू: ११ नोव्हेंबर २००४)
१९३२ : रावसाहेब गणपराव जाधव मराठीतील व्यासंगी साहित्यसमीक्षक. 'महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळा'चे तिसरे अध्यक्ष व 'मराठी विश्वकोशा'चे प्रमुख संपादक (२००१ २००३).
१९४४ : संयुक्ता पाणिग्रही ओडीसी नर्तिका (मृत्यू: २४ जून १९९७)
१९४५ : डब्ल्यू.डब्ल्यू.ई.चे सहसंस्थापक विन्स मॅकमेहन यांचा जन्म.
१९४७ : पॉलो कोहेलो ब्राझिलियन लेखक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९२५ : सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर संस्कृत पण्डित, प्राच्यविद्या संशोधक, भाषाशास्त्रज्ञ, इतिहास संशोधक व समाजसुधारक (जन्म: ६ जुलै १८३७)
१९६७ : कैसर शिपयार्ड आणि कैसर एल्युमिनियम चे संस्थापक हेन्री जे. कैसर यांचे निधन. (जन्म: ९ मे १८८२)
१९६८ : आधुनिक भारताचे अग्रगण्य विचारवंत आणि सामाजिक वैज्ञानिक, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्रचे प्राध्यापक तसचं, लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरू राधाकमल मुखर्जी यांचे निधन.
१९९३ : शतायुषी क्रिकेटमहर्षी प्रा. दिनकर बळवंत तथा दि. ब. देवधर प्रथमश्रेणीचे ६२ सामने, १०० डाव, ११ वेळा नाबाद, ९ शतके, ३९५१ एकूण धावा, ४४.३९ सरासरी. भारत सरकारतर्फे त्यांना पद्मश्री (१९६५) व पद्मविभूषण (१९९१) या पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते. (जन्म: १४ जानेवारी १८९२)
२००० : कल्याणजी वीरजी शाह सुमारे तीन दशके रसिकांवर आपल्या सुरावटीची मोहिनी घालणार्या 'कल्याणजी-आनंदजी' या संगीतकार द्वयीतील ज्येष्ठ बंधू (जन्म: ३० जून १९२८)
२००८ : चिनी भाषेमधील कवी, लेखक, पत्रकार वै वै यांचे निधन.
२०१८ : जॉन मैककेन, जॉन सिडनी मॅककेन तिसरा हा एक अमेरिकन राजकारणी व ॲरिझोना राज्यातून वरिष्ठ सेनेटर.(जन्मतारीख: २९ ऑगस्ट, १९३६)
२०१९ : भारताचे केंद्रीय अर्थमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अरुण जेटली यांचे निधन. (जन्म: २८ डिसेंबर १९५२)

# बदलापूर प्रकरणात आरोपींविरुद्ध त्वरित खटला चालवून कठोर शिक्षा देण्याची मागणी

## जमात-ए-इस्लामी हिंदच्या वतीने शासनास निवेदन



बीड । प्रतिनिधी

बदलापूर, ठाणे येथील दोन लहान मुलींचे लैंगिक शोषण आणि बलात्काराच्या प्रयत्नाचा तसेच पश्चिम बंगालमधील कोलकाता येथील आर. जी. कार मेडिकल कॉलेजमधील प्रशिक्षु डॉक्टरच्या बलात्कार-हत्या प्रकरणाचा निषेध करत आरोपींविरुद्ध त्वरित खटला चालवून कठोर शिक्षा देण्याची मागणी जमात-ए-इस्लामी हिंद, बीड जिल्हा, महिला विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत महाराष्ट्र शासनास निवेदन देण्यात आले आहे. निवेदनामध्ये नमूद करण्यात आले आहे की बदलापूर, ठाणे येथील ३ आणि ४ वर्षांच्या दोन लहान मुलींचे शाळेत लैंगिक शोषण आणि बलात्काराच्या प्रयत्नाचा तसेच आर.जी. कार मेडिकल कॉलेजमधील प्रशिक्षु डॉक्टरच्या क्रूर बलात्कार व हत्येचा निषेध व्यक्त करत आहोत.

बदलापूर प्रकरणात, आम्ही आरोपींविरुद्ध त्वरित खटला चालवून कठोर शिक्षा देण्याची मागणी करतो. ज्या शाळेत हा प्रकार घडला त्या शाळेच्या अधिकाऱ्यांना सुरक्षा आणि संरक्षानिष्कर्षांचे पालन न केल्याबद्दल (स्त्री परिचारिका आणि सीसीटीव्ही कॅमेरे नसणे) दोषी ठरवून कारवाई करण्यात यावी. ज्या पोलिसांनी एफआयआर नोंदविण्यात उशीर केला त्या बदलापूर पोलिस अधिकाऱ्यांवर देखील दंडात्मक कारवाई करण्यात यावी. कोलकातामधील प्रशिक्षु डॉक्टर प्रकरणात, पीडितेचे शरीर अनेक जखमांसह आढळले असल्याची बातमी वाचून आम्ही हादरलेलो आहोत, ज्यात लैंगिक अत्याचाराचे आणि गळा आवळल्याचे पुरावे आहेत. या दोन्ही गुन्ह्यांच्या भयंकर स्वरूपामुळे संपूर्ण देशात खळबळ उडाली आहे आणि भारतातील महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा तातडीने चर्चेला घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, विशेषतः शाळा, महाविद्यालये आणि काम करणाऱ्या मुली आणि महिलांमध्ये.आम्ही खालील मुद्द्यांवर तात्काळ आणि ठोस कारवाईची मागणी करतो: १. सखोल चौकशी: या प्रकरणांची सर्वसमावेशक चौकशी करून पीडितांना न्याय मिळवून देण्याची आणि कायदा व्यवस्थेवरील विश्वास पुनर्स्थापित करण्याची आमची मागणी आहे. २. सुरक्षा उपायांचा विकास : सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये कडक सुरक्षा नियमावली राबविणे अत्यंत आवश्यक आहे, ज्यामध्ये सुरक्षा कॅमेरे, चांगली प्रकाशयोजना, आणि आपत्कालीन प्रतिसाद प्रणालींचा समावेश असावा. ३. जनजागृती मोहिमा: महिलांचा आदर वाढविण्यासाठी आणि लैंगिक हिंसाचाराबद्दल जनजागृती करण्यासाठी शैक्षणिक उपक्रमांची अत्यंत आवश्यकता आहे. समाजाच्या स्तरावर सहमतीच्या महत्त्वाविषयी आणि महिलांविरुद्ध हिंसाचाराचे गंभीर परिणाम याबद्दल जागरूकता कार्यक्रम आयोजित केले जावेत. ४. पीडितांना सहाय्यता: लैंगिक हिंसाचाराच्या पीडितांसाठी सल्ला, कायदेशीर सहाय्यता आणि वैद्यकीय काळजी यांसह समर्पित सहाय्यता प्रणालींची स्थापना करणे आवश्यक आहे, ज्यामुळे पीडितांनी पुढे येऊन गुन्ह्यांची नोंद करणे सोपे होईल. ५. कायदा अंमलबजावणीतील जबाबदारी: कायदा अंमलबजावणी यंत्रणेमध्ये जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करतो, ज्यामुळे सर्व अधिकारी नागरिकांचे संरक्षण करण्याचे कर्तव्य पार पाडतील आणि महिलांविरुद्ध होणाऱ्या हिंसाचाराच्या तक्रारींवर तत्काळ कारवाई करतील. ६. सदाचरण: आम्ही समाज आणि सरकारला शाळांमध्ये नैतिक शास्त्राची शिकवण सुरू करण्याची आणि चरित्र निर्माणाच्या कामावर भर देण्याची विनंती करतो. मुख्य प्रवाहातील माध्यमे, सामाजिक माध्यमे आणि मनोरंजन उद्योगात उघडपणे चालवले जाणारे अश्लीलता, अशिष्टता, महिलांचे वस्तूकरण आणि अश्लीलतेला आळा घालण्याची आणि त्याचे नियंत्रण करण्याची गरज आहे. लैंगिक गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे एक पवित्र आणि परमेश्वर-भीत समाज निर्माण करणे, जिथे महिलांचा सन्मान केला जातो आणि त्यांना त्यांचे खरे आणि प्रतिष्ठित स्थान दिले जाते. आम्ही आशा करतो की आपण आमच्या चिंता गांभीर्याने घ्याल आणि भविष्यात अशा अमानुष घटनांचा पुनरावृत्ती होऊ नये म्हणून आवश्यक पावले उचालाल. या वेळी डॉ. शाहीन आमेर अली जिल्हा संघटक, महिला विभाग ,जमात ए इस्लामी हिंद व खैसर सुलताना खदिरोद्दिन शहर संघटक, महिला विभाग जमात-ए-इस्लामी हिंद, बीड सह अनेक महिला सदस्य आणि प्रा. शफीक हाशमी, डॉ सिराज खान आरजु आदी उपस्थित होते.

# योग्य आहार व विहाराने आरोग्य अबाधित राहते - डॉ. बोबडे




पाटोदा । प्रतिनिधी

आजच्या धकाधकीच्या जीवनात कामाचा व मानसिक ताणतणाव घेतल्यामुळे व योग्य आणि संतुलित आहार तसेच व्यायाम याकडे दुर्लक्ष केल्यामुळे हृदयसंबंधी विकार निर्माण होतात, म्हणून हृदयरोगांपासून स्वतःचा बचाव करून निरोगी जीवन जगण्यासाठी योग्य आहार व विहाराची नियमित सवय जोपासल्यास आरोग्य अबाधित राहते असे प्रतिपादन बीडच्या मेडीकेअर हार्ट हॉस्पिटलचे हृदयरोग तज्ज्ञ डॉ. सुनील बोबडे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या कर्मचारी कल्याण समिती व भौतिकशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उद्बोधनपर अतिथी व्याख्यानात ते प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर विशेष अतिथी डॉ. के. टी. सानप, उपप्राचार्य प्रोफेसर किशोर मचाले, क. म. उपप्राचार्य नामदेव चांगण उपस्थित होते. प्रमुख अतिथींचा परिचय डॉ. दिलीप गिऱ्हे यांनी करून दिला. 'आरोग्य व हृदयाची काळजी' या विषयावर आयोजित मार्गदर्शनपर व्याख्यानात डॉ. सुनील बोबडे यांनी संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजार, मधुमेह व त्याचे प्रकार, हृदयसंबंधी विविध चाचण्या यांचे सविस्तर विश्लेषण केले. हृदयविकाराचा झटका आल्यास योग्य तो प्रथमोपचार व औषधी याविषयीदेखील मार्गदर्शन केले. त्यानंतर त्यांनी उपस्थितांच्या प्रश्न व शंकांचे निरसन केले.अध्यक्षीय समारोप प्राचार्य प्रोफेसर हांगे यांनी केला. सूत्रसंचालन डॉ. शरद पवार यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा. रुपेश कोकाटे यांनी केले. व्याख्यानास प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# कॅनरा बँक मॅनेजरच्या मनमानीला खातेदार, निराधार, दिव्यांग लाभार्थी कंटाळले

## चौकशी करून न्याय द्यावा अन्यथा उपोषणाचा इशारा

जालना । प्रतिनिधी

अंबड आणि जालना शहरातील कॅनरा बँकेत गोरगरीब निराधार, दिव्यांग लाभार्थ्यांना त्रास होत आहे. याबाबत बँकेचे मॅनेजर दुर्लक्ष करीत असून, मनमानी पध्दतीने कारभार करीत आहे. या कारभाराला आळा घालून सर्वसामान्यांची कामे इमानेइतबारे करावीत अन्यथा २५ ऑगस्टपासून लोकशाही मार्गाने उपोषण करण्याचा इशारा मॉ सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब शिवाजीराव वानखेडे यांनी दिला आहे.

याबाबत जिल्हाधिकार्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले की, अंबड कॅनरा बँक शाखाधिकारी व कॅशियर व जालना शहरातील कॅनरा बँक ,जालना तहसील विभागातून संजय गांधी निराधार विभागातून वयोवृध्द, विधवा, अंध, दिव्यांग या व्यक्तीचे अनुदानाचे धनादेश बँकेत जमा करण्यात आलेले आहे. परंतू सदर बँकेच्या अधिकारी-कर्मचार्यांनी धनादेश वटविले नाही. त्यामुळे खातेदारांच्या खात्यात अजुनही रक्कम जमा झाली नाही. याबाबत विचारणा करण्यास गेलेल्या लाभार्थ्यांना सदरील मॅनेजर व कर्मचारी उध्दटपणे बोलून अपमान करीत आहे. शाखा मॅनेजरच्या दररोजच्या मनमानीला लाभार्थी कंटाळले असून, दररोज चकरा मारीत आहे. तरी सदरील मॅनेजरची चौकशी करून, त्याच्याविरूध्द कारवाई करावी व लाभार्थ्यांचे अनुदान त्यांच्या खात्यात जमा करावे नसता लोकशाही मार्गाने २५ ऑगस्टपासून उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# ड्रोनचा आणि चोरट्यांचा काहीही संबंध नाही, अफवांवर विश्वास ठेवू नका

## पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांचे आवाहन



अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांची उपस्थिती होती.

बीड । प्रतिनिधी

सध्या बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, वडवणी, शिरूर आदी तालुक्यात ड्रोन उडवले जात आहेत. यामुळे नागरिक भयभीत झाले आहेत. याबाबत पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी खुलासा केला असून चोरट्यांचा आणि या ड्रोनचा काहीही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे कुणीही अफवांवर विश्वास ठेऊ नये असे आवाहन केले आहे. हे ड्रोन कुणाचे आहेत, कशासाठी उडवले जात आहेत याबाबत लवकरच खुलासा केला जाईल अशी माहिती बारगळ यांनी शुक्रवारी (दि.२३) पोलीस अधीक्षक कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी

# पाटोदा नगरपंचायतच्या कारभारामुळे खावा लागत्यात खस्ता-जावळे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा नगरपंचायत वार्ड एक मधील माऊली नगर मध्ये रस्ता नसल्यामुळे सर्वत्र चिखल मय परिसर झाल्याने येथील नागरीकांना चालणे फिरणे फार अवघड झालेले असून या भागात घाणीचे साम्राज्य वाढल्याने डेंगू चिकन गुनियाचे घराघरात रुग्ण सापडत आहे.

तसेच भर पावसाळ्यात नळाद्वारे आठ आठ दिवस झाले तरी पाणी येईना तर माऊली नगर मधील काही भागात विद्युत पोलवर विद्युत दिवे नाहीत या मुळे सर्वत्र अंधारच अंधार आसुन भारत स्वातंत्र्य होऊन ७५ वर्षे होऊन गेली तरी पण माऊली नगर वासियांना ना रस्ता,ना पाणी,ना लाईट,विना पाटोदा नगरपंचायतच्या ढसाळ नियोजना मुळे खावा लागत्यात खस्ता अशी टिका युवानेते दादा जावळे यांनी केली आसुन पाटोदा नगरपंचायतने लवकरात लवकर उपाय योजना कराव्यात नसता पाटोदा नगरपंचायतच्या दारात लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे युवा नेते दादा जावळे यांनी दिला आहे.

# नुतन विद्यालयाचे जिल्हास्तरीय वादविवाद स्पर्धेत यश



धारूर । प्रतिनिधी

केज येथे स्वामी विवेकानंद विद्यालयात आयोजीत जिल्हास्तरीय वावविवाद स्पर्धेत तालुक्यातील अंजनडोह येथील नुतन माध्यमीक विद्यालयाचे सघाने घवघवीत यश संपादन करत प्रथम क्रमाक मिळवला या यशस्वी विद्यार्थी व मार्गदर. शक शिक्षक यांचा शाळेत गौरव करण्यात आला या यशस्वी संघाचे सर्वत्र कौतूक होत आहे.

नूतन विद्यालयाचे वादविवाद स्पर्धेत घवघवीत यश चे विद्यार्थ्यांनी २२ ऑगस्ट रोजी स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विद्यालय ,केज. या शाळेत घेण्यात आलेल्या भव्य शालेय वादविवाद स्पर्धेत नूतन माध्यमिक विद्यालय, अंजनडोह. तालुका धारूर. या शाळेतील विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. घवघवीत यश मिळवले या स्पर्धेत विद्यार्थिनी कुमारी सोफिया पाशा सय्यद वर्ग नववा व कुमारी सुषमा सतीश सोळुंके वर्ग दहावा यांच्या बक्षिसाचे स्वरूप शाळेसाठी ट्रॉफी व रोख रक्कम तीन हजार रुपये असे आहे. संस्थेच्या ,शाळेच्या वतीने दोन्ही विद्यार्थ्यांनी आणि मार्गदर्शक श्रीमती के एस हांडीबाग यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे सचिव सुंदरराव आदमाने ,अध्यक्ष . ज्ञानेश्वर ठोंबरे, तसेच शाळेचे मुख्याध्यापक एन पी देशमुख व मार्गदर्शक श्रीमती के एस हंडीबाग शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# शाहूराव सानप यांचे दु:खद निधन



बीड -ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक शाहूराव कारभारी सानप यांचे वृद्धपकाळाने दिनांक २३ ऑगस्ट रोजी दु:खद निधन झाले ,त्यांचा अंत्यविधी २४ ऑगस्ट रोजी सकाळी ०९.०० वा. वडझरी ता.पाटोदा या गावी होणार आहे. पाटोदा तालुक्यातील वडझरी येथील ते मूळचे रहिवासी होते. वडझरीचे सरपंच संजय शाहूराव सानप व जीवन शाहूराव सानप यांचे ते वडील होत, त्यांच्या पश्चात चार मुले, पत्नी,सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# तरुण युवकांने सुसंगत करावी-गणेश बोबडे





चौसाळा । प्रतिनिधी

समाजात व्यक्तीला चांगले जीवन जगायचे असेल तर त्याने चांगल्या व्यक्तीशी सुसंगत करावी अशे सांगून योग्य व्यक्तीशी संगत झाल्यास जीवनात ती व्यक्ती यशयस्वी होते असे प्रतिपादन गणेश महाराज बोबडे शेगाव याने केले चौसाळा ता बीड येथील हनुमान मंदिरात प्रति वर्षा प्रमाणे या वर्षी ही शिव पुराण ज्ञानेश्वरी पारायण व दैनंदिनी कीर्तनाचे आयोजन करण्यात आले.

आयोजित केलेल्या कीर्तनातून गणेश महाराज बोबडे यांनी सांगितले की संगत ही सुज्ञान व्यक्तीशी असावी त्यातूनच माणूस प्रामाणिक व प्रतिष्ठित घडला जातो अशे सांगून जीवनात व्यक्तीला संगत ही चांगली असणे हे गरजेचे आहे अशे सांगितले सदर साप्ताहात पंढरीनाथ महाराज ढिगुले उमेश महाराज पुरी ज्ञानेश्वर महाराज यांचा पण सहभाग असून त्यांचे गायनाचे कार्यक्रम आयोजित केले आहे या साप्ताहत अनेक मान्यवर कीर्तन झाले तर उर्वरित कार्यक्रमात ज्ञानेश्वर महाराज मेहुणकर चांगदेव महाराज काकडे यांचे कीर्तन आयोजित केले असून दिनांक २६/८/२४ रोजी रात्री महेश महाराज निनाळे यांचे कीर्तन होणार असून दि २७/८/२४ रोजी लक्षमन महाराज मेंगडे मठादी पती बंकट स्वामी सौष्ठान पंढरपूर यांच्या कल्याचे कीर्तन आयोजित केले आहे तरी या कार्यक्रमाचा चौसाळा येथील परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा अशे आव्हान चौसाळा येथील ग्रामस्थानी केले आहे

# रविकांत तुपकर पोलिसांच्या ताब्यात

मुंबईः शेतकरी कर्जमुक्ती, हक्काचा पीकविमा, सोयाबीन, कापूस दरवाढीसह शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा शासकीय निवासस्थानी शेतकरी नेते रविकांत तुपकर शुक्रवारी (दि.२३) आंदोलन करणार होते. दरम्यान, तुपकर यांना मुंबई येथे मरीन ड्राईव्ह पोलिसांनी एका हॉटेलमधून अटक केली. तुपकरांना पोलिसांनी ताब्यात घेतले असले तरी शेतकऱ्यांनी मात्र गिरगाव चौपाटीवर आंदोलन केले. तुपकरांना आझाद मैदानातील पोलीस चौकीत आणले. त्यानंतर त्यांना किल्ला कोर्टात हजर करण्यात आले. मला जरी पोलिसांनी अटक केली असली तरी शेतकऱ्यांचा आवाज दाबता येणार नाही. काही दिवसांत आपल्या हक्कासाठी संपूर्ण राज्यातील शेतकरी लवकरच रस्त्यावर उतरलेले दिसतील. मात्र, ते सरकारला जड जाईल, असा इशारा यावेळी तुपकरांनी दिला.

# नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार लाभ मिळणार

## जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा- परमेश्वर वरखडे



जालना । प्रतिनिधी

महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने अंतर्गत प्रोसाहन लाभाची घोषणा शासनाने केली होती. नियमित कर्जाची परतफेड करणार्या शेतकर्यांना रु.५० हजार लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. जिल्हयातील १६८२२ शेतकर्यांना प्रोत्साहन निधी मिळालेला आहे. मात्र अनेक कारणांनी आधार प्रमाणिकरण न झाल्याने ६६६ लाभार्थी शेतकरी अजुनही निधीच्या प्रतिक्षेत आहेत.

महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ (चगझडघध-२०१९) प्रोत्साहनपर लाभ योजने अंतर्गत प्रोत्साहनपर लाभास पात्र ठरलेल्या परंतु आधार प्रमाणिकरण न झालेल्या शेतकर्यांसाठी महाआयटी यांनी दि.१२-०८-२०२४ ते ०७-०९-२०२४ पर्यंत आधार प्रमाणिकरणाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. चगझडघध-२०१९ योजनेचा लाभ घेण्यासाठी योजनेस पात्र असलेल्या संबंधीत शेतकर्यांनी त्यांचे आधार प्रमाणिकरण करणे अत्यावश्यक व बंधनकारक असुन आधार प्रमाणिकरण करण्यासाठी ही अंतिम संधी आहे. आधार प्रमाणीकरणानंतर पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ होणार आहे. त्यासाठी शेतकर्यांना महा-आयटी मार्फत लघु संदेश (डचड)देण्यात आला आहे. तथापी, त्याबाबत सर्व बँकांनी देखील संबंधीत सर्व शेतकर्यांना व्यक्तीशः कळविणे आवश्यक आहे. त्यानुसार योजने अंतर्गत विशिष्ट क्रमांकासह यादीमध्ये नाव समाविष्ठ असलेल्या परंतु अद्याप आधार प्रमाणिकरण न झालेल्या लाभार्थी शेतकर्यांसाठी आधार प्रमाणिकरणाची सुविधा सुरु करण्यात आलेली असुन आधार प्रमाणिकरण बाकी असलेल्या शेतकर्यांनी त्यांचे आधार प्रमाणिकरण दिनांक ०७ सप्टेंबर २०२४ पर्यंत पुर्ण करावयाचे आहे. त्यानंतर आधार प्रमाणिकरणाची सुविधा बंद होणार आहे. या कालावधीत आधार प्रमाणिकरण केल्यास योजनेचा लाभ मिळु शकणार नाही. योजनेस पात्र असलेल्या शेतकर्यांची विशिष्ट क्रमांकासह प्रसिध्द झालेल्या यादीतील ६६६ शेतकर्यांनी त्यांचे आधार प्रमाणिकरण अद्याप पावेतो पुर्ण केलेले नाही. आधार प्रमाणिकरण बाकी असलेल्या संबंधीत शेतकर्यांनी सदर योजनेच्या लाभासाठी मुळ आधिारकार्ड व बचत खात्याचे पासबुक घेऊन संबंधीत बँकेत, उडउ व आपले सरकार सेवा (-डडघ) केंद्रावर जाऊन तातडीने आधार प्रमाणिकरण करुन घेण्याचे आवाहन, परमेश्वर वरखडे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधीत बँक शाखा, वि.का. संस्था कार्यालये तसेच तालुका उपसहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले.

# कायद्याला उडवता; येणाऱ्या निवडणुकीत हिसका दाखवू - बंटी सदाशिवे



पाटोदा । प्रतिनिधी

ऑल इंडिया पँथर सेनेचे महाराष्ट्र प्रवक्ते बंटीदादा सदाशिवे यांनी आमदार संजय शिरसाठ यांचा आक्रमक पणे समाचार घेतला आहे. कायद्याला उडवून लावण्याची भाषा एका संविधानिक पदावर बसलेला आमदार करत असेल तर हे निषेधार्थ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चार लेकरं गमावून आम्हाला संविधान दिले याचा विसर या आमदाराला पडला आहे. समाज माफ करणार नाही, येणाऱ्या निवडणुकीत यांना हिसका दाखवला जाईल.

केंद्रात, राज्यात सरकार तुमची, गृहमंत्री तुमचा त्यावर बोलत नाहीत. ठेचायची भाषा करा आम्ही स्वागत करतो, ज्या भाजपा पदाधिकाऱ्याची शाळा आहे त्याला कधी ठेचता? औरंगाबादला बसून तुम्ही कायद्याला उडवता, तिथे त्या चिमुरडीला भेटायला गेले का? उंटावरून शेळ्या हाकता? हजारो दलित अत्याचार झाले कधी त्या दलितांना विचारले का? आम्ही काहीही सहन करू पण बाबासाहेबांच्या कायद्याला कुणी उडवण्याची भाषा करत असेल तर त्याला ऑल इंडिया पँथर सेना सोडणार नाही. आम्ही शांत बसणार नाहीत, या आमदाराने माफी मागावी. छत्रपती संभाजीनगर मध्ये मोर्चा काढून संजय शिरसाठ यांच्यावर आजीवन निवडणूक लढवण्यास बंदी घालावी अशी मागणी करणार आहोत. तात्काळ विधानसभा अध्यक्षानी या वक्तव्याची दखल घेऊन आमदारकी रद्द करावी. आमदार होताना काय शपथ घेतली याची जाणीव त्यांना करून द्यावी. अशी संतप्त प्रतिक्रिया ऑल इंडिया पँथर सेनेनी घेतली आहे.

# बीड जिल्ह्यातील साडेतीनशे शाळांना शौचालयच नाहीत

## बदलापूरच्या घटनेनंतर जिल्ह्यातील मुलींचे पालक आक्रमक, स्वच्छ भारत मिशनचे अधिकारी फक्त खुर्च्या उबवायलाच आहेत का? पालकांचा संतप्त सवाल

**बीड । प्रतिनिधी**

**पालघर जिल्ह्यातील बदलापूर येथील लहान मुलीच्या अत्याचार प्रकरणानंतर बीड जिल्ह्यातील मुलींचे पालक हे आता सावध झाले आहेत. बीड जिल्ह्यातील जवळपास साडेतीनशे शाळांना शौचालयच नाहीत. जिल्ह्यातील काही माध्यमिक शाळांमध्ये शौचालय असणे गरजेचे असतानाही या ठिकाणी शौचालय बांधण्याकडे स्वच्छ भारत मिशनच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाले स्वच्छ भारत मिशनचे अधिकारी केवळ खुर्च्या उबवायलाच आहेत काय? असा संतप्त सवाल पालक करीत आहेत.**



शासनाने शाळांसाठी शौचालय अनुदानाची तरतूद केलेली असतानाही केवळ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे शाळांना शौचालय मिळत नाहीत. याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. अशी पालकांची तक्रार असून जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनीच आता यात लक्ष घालून ही प्रक्रिया तात्काळ पूर्ण करून साडेतीनशे शाळांना शौचालय द्यावीत अशी मागणी पालकातूनच होऊ लागली आहे. या शौचालयाची प्रक्रिया येत्या महिन्याभरात झाली नाही तर जिल्हाभरात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा पालकांनी दिला आहे. विशेषतः सौताडा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत ४५० विद्यार्थी असताना आणि या ठिकाणी मुलींची संख्या लक्षणीय म्हणजे जवळपास दीडशे मुली असताना या ठिकाणी शौचालय नाही. दोन वर्षांपूर्वी एक शौचालय बांधले तेही अर्धवट स्थितीत आहे. अशी परिस्थिती असेल तर मुलींच्या संरक्षणाचे काय? असा सवालही केला जात आहे.

गेल्या काही दिवसा दिवसापासून महाराष्ट्रामध्ये मुलींवरील अत्याचाराच्या घटना घडताना दिसत आहेत. मात्र बदनामीच्या भीतीने अनेक जण तक्रारी करण्याचे टाळत आहेत. बदलापूरच्या घटनेनंतर पालकांच्या मनात असंतोष निर्माण झाला आहे.मुलींच्या सुरक्षेसाठी राज्य शासनाने प्रत्येक शाळेमध्ये शौचालय असावे असा नियम काढला. खाजगी संस्थांनी त्यांच्या वैयक्तिक निधीतून ही शौचालये बांधावीत आणि सरकारी शाळांमध्ये स्वच्छ भारत मिशन च्या निधीतून सार्वजनिक शौचालय बांधावीत असे आदेश काढले. यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची तरतुद करण्यात आली. मात्र जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांच्या वृत्तीमुळे जिल्ह्यातील शाळांमध्ये शौचालय पूर्ण होऊ शकली नाहीत. मग जिल्हा परिषदेत अधिकारी केवळ खुर्च्या उबवायला बसले आहेत काय? असा संतप्त सवाल विद्यार्थ्यांचे पालक करीत आहेत. विशेषता सौताडा येथील शाळेमध्ये आज तागायत जवळपास ४५० विद्यार्थी आहेत.

यामध्ये जवळपास १५० मुली आहेत. मात्र या ठिकाणी एकही शौचालय आज नाही .गेल्या दोन वर्षांपूर्वी एक डब्बा बांधून ठेवला. मात्र त्यामध्ये शौचालयाची व्यवस्था झाली नाही. केवळ निधी नसल्यामुळे हे शौचालय पूर्णपणे बांधण्यात आले नाही. असे सांगितले जाते. शासनाचा निधी असतानाही केवळ अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे ही शौचालय होत नाहीत. शाळेच्या सुविधासाठी अनेक वेळा आंदोलने झाली. निवेदने देण्यात आली. मात्र याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले. जिल्हा परिषदेकडे निधी असतानाही शौचालय का होत नाहीत. यातील झारीतले शुक्राचार्य कोण? याचाही तपास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी लावला पाहिजे जर निधी असूनही शौचालय होत नाहीत तर नेमके काय कारण आहे हे जनतेला कळले पाहिजे. स्वच्छ भारत मिशनच्या निधीमधून लाखो रुपयांच्या जाहिराती केल्या जातात. त्या नेमक्या कुठे केल्या जातात हा ही मोठा प्रश्न आहे. मात्र बॅनरबाजी करून स्वच्छ भारत मिशनचे मिशन पूर्ण होणार नाही. त्यासाठी प्रत्यक्ष कामच करावे ◀◀ पान ३ वर

# माजलगाव पोलिसांनी गाढव चोरी करणारी आंतरराज्य टोळी पकडली

## आंध्रप्रदेशच्या ६ आरोपी विरुध्द शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल,दोघांना अटक,१४ गाढव घेतली ताब्यात

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातून आयशर टेम्पो मध्ये गाढव चोरून नेणारी टोळी माजलगाव शहर पोलिसांनी पकडली.ही कार्यवाही दि २३ ऑगस्ट शुक्रवार रोजी पहाटे ३:०० वाजण्याच्या दरम्यान धारूर रोड एलआयसी ऑफिस समोरुन पाठलाग करत परभणी जिल्ह्यातील चाठबोरगाव (सेलू) येथे करण्यात आली.दरम्यान आंध्र प्रदेशच्या ६ आरोपी विरोधात माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असुन पोलीसांकडून दोन आरोपीस अटक करण्यात आली आहे

याबाबत मिळालेली माहिती अशी की,दि २३ ऑगस्ट शुक्रवार रोजी मध्यरात्री सुरू असलेल्या पोलीस गस्ती पथकाला खबऱ्या



मार्फत माहिती समजली की,भुरकट रंगाचा आयशर टेम्पो (ए. पी.टी. ७५०३) यामध्ये गाढव चोरून नेल्या जात आहेत.यावरून पोलिसांनी सापळा रचला.धारूर रोड एलआयसी ऑफिस समोर टेम्पो आला. परंतु टेम्पो चालकाने पोलिसांना पाहताच टेम्पो वेगाने पळवला.दरम्यान पोलीस चालक गायकवाड यांनीही त्याच गतीने टेम्पोचा पाठलाग करत गाढव चोरून नेणारा टेम्पो परभणी जिल्ह्यातील चाठबोरगाव (सेलू) येथे पकडून माजलगाव शहर ठाण्यात जमा केला, यावेळी पोलिसांनी परिसरात गाढवाचा वीट वाहतुकीसाठी उपयोग करणाऱ्या व्यक्तींना बोलावून घेतले.त्यावेळी त्यांना समजले की त्यांची गाढवे चोरून नेली होती.दरम्यान अंकुश काशिनाथ घेणे राहणार भोई गल्ली यांच्या फिर्यादीवरून टेम्पो चालक १) आप्पालारामलू रा.चिरायला,जिल्हा प्रकाशन आंध्र प्रदेश,२) महेश रेड्डी, ३) श्रीनिवासन याच्यासह इतर तिघाजणांवर शहर पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान दोन आरोपी पोलिसांच्या ताब्यात असून इतरांचा शोध सुरू आहे.ही कार्यवाही नव्याने रुजू झालेली पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे.कॉ.गणेश तळेकर, पो.हे.कॉ.अनिल भालेराव,पो.कॉ. महेश चव्हाण, पोलीस वाहन चालक गायकवाड यांनी पार पाडली.

# मुख्यमंत्री व पालकमंत्र्यांकडून माजी.आ. भीमराव धोंडे यांच्या मागणीची दखल,ई पीक पाहणीची अट रद्द

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या कडून मा. आ. भीमराव धोंडे यांच्या मागणीची दखल घेत ई पीक पाहणीची अट रद्द करण्यात आल्याने आता शेतकऱ्यांना सरसकट अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

यावाबत अधिक माहिती अशी की, कधी अतिवृष्टी तर दुष्काळी परिस्थितीमुळे आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघातील शेतकरी सतत आर्थिक संकटात सापडतो. यावर्षी देखील जिल्ह्याच्या अनेक भागात अतिवृष्टीने पिकांचे मोठ्या



प्रमाणात नुकसान झाले आहे. परंतु अनुदान मिळण्यासाठी शासनाने ई पिक पाहणीची जाचक अट घातली होती. ई पिक पाहणी सर्वच शेतकरी करु शकत नाहीत. सर्वच शेतकऱ्याकडे अँड्रॉइड मोबाईल नाहीत तसेच ग्रामीण भागात मोबाईल रेंजचा प्रश्न उद्भवतो, सर्व्हर डाऊनचाही प्रश्न निर्माण होतो त्यामुळे सर्व शेतकरी ई पिक पाहणी करू शकत नाहीत. किमान ४० ते ५० टक्के शेतकरी ई पीक पाहणी करु शकले नाहीत त्यामुळे ते अनुदानापासून वंचित होते. माजी आमदार भिमराव धोंडे यांनी सर्व सामान्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी १० जुलै २०२४ पासून मतदारसंघात जनसंपर्क अभियान सुरू केले. यामध्ये अनेक वाड्या वस्त्यां वरील शेतकऱ्यांनी ई पिक पाहणीची जाचक अट रद्द करुन सरसकट अनुदान द्यावे अशी मागणी केली होती. शेतकऱ्यांच्या मागणीची ◀◀ पान ३ वर

# शिवसैनिकांनो, बीड विधानसभेवर शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी दंड थोपटून मैदानात उतरा– मोरे

**शिवसेना कार्यालयात जिल्हा आढावा बैठक संपन्न**

**बीड । प्रतिनिधी**

तळागाळातील लोकांची जाण असणारे महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब सर्व सामान्य जनतेसाठी अहोरात्र काम करून लोकांभिमुख योजना राबवत आहेत. राज्याच्या हितासाठी मुख्यमंत्री शिंदे साहेब पुन्हा सत्तेवर येणे काळाची गरज आहे.



याबरोबरच शिंदे साहेबांच्या नेतृत्व मार्गदर्शनाखाली शिवसेना पक्षाची यशस्वी वाटचाल सुरु आहे. जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांच्या कार्यपद्धतीवर सन्मानीय मुख्यमंत्री शिंदे साहेब प्रचंड खुश आहेत. अनिलदादा जगताप हा बीडकरांच्या मनावर राज्य करणारा आणि यंदाच्या विधानसभेचा प्रबळ दावेदार असल्याने आपल्या सर्वांची ◀◀ पान ३ वर

# अल्पवयीन मुलीवरील अत्याचार रोखलेच पाहिजेत

## शिक्षण संस्थांनी प्रत्येक शाळेत सीसीटीव्ही बसवावेत – राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

बदलापूर येथील शाळेमध्ये दोन अल्पवयीन मुलीवर घडलेली अत्याचाराची घटना लांच्छनास्पद असुन संवेदनाशील समाजाला चिंतनात टाकणारी गंभीर बाब आहे. या घटनेमुळे शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला. अत्याचार रोखण्यासाठी राज्य सरकारने सुचवलेल्या सर्व उपाय योजनांची पूर्तता सर्व शिक्षण संस्थांनी करून अल्पवयीन मुलीवरील अत्याचार रोखण्यासाठी प्रामाणिकपणे पुढाकार घ्यावा, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.



बदलापूर घटनेमुळे सर्वांचे हृदय पिळवटून गेले. संस्था व्यवस्थापन आणि पोलीस प्रशासनाचे झालेले दुर्लक्ष यामुळे पालक वर्गात प्रचंड संतप्त भावना व्यक्त झाल्या. आशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी राज्य सरकारने दि. २४ ऑगस्ट २०२४ रोजी काढलेला शासन निर्णय महत्त्वाचा आहे. या अनुषंगाने शाळांमध्ये विद्यार्थी विद्यार्थिनींच्या सुरक्षा विषयक निर्देशित केलेल्या सर्व उपाय योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी. प्रशासन, शिक्षण संस्था, यांनी प्रामुख्याने पुढाकार घेण्याची गरज आहे. एकत्रित कृतीतून निश्चितपणे अत्याचार रोखता येतील. यासाठी शाळा व परिसरात विद्यार्थी, शिक्षक कर्मचारी यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी ◀◀ पान ३ वर

# वाहतूक पोलिसांनी केली अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या हायवावर कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा वाहतूक शाखेने पोलीस अधीक्षकांच्या आदेशावरून गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन फाट्यावर एका विना नंबरच्या हायवेला ताब्यात घेतले. या हायवा मध्ये अवैधरित्या पाच ब्रास वाळू वाहतूक करताना रंगेहात पकडण्यात आले .पुढील कारवाईसाठी पोलिसांनी गेवराई पोलीसांकडे हायवा सुपुर्द केला असून त्याच्यावर कारवाई करण्याची जबाबदारी आता तहसीलदारांची आहे. या संदर्भात जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांनी तहसीलदारांना पत्रही दिले आहे .आता तहसीलदार काय कारवाई करतात याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे .

बीड जिल्हा वाहतूक शाखेने पोलीस अधीक्षकांच्या आदेशाने २२ ऑगस्ट रोजी रात्री ११च्या सुमारास गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन फाट्याजवळ पेट्रोलिंग करत असताना रात्री ११.३० वाजता त्यांना एक विनाक्रमांकाचा हायवा अवैध वाळू वाहतूक करताना निदर्शनास आला.वाहतूक पोलिसांनी हा विना नंबरचा हायवा तात्काळ ताब्यात घेतला. त्याची तपासणी केली असता यामध्ये ५ ब्रास वाळू निदर्शनास आली . चालकाची चौकशी केली असता राम ज्ञानोबा वाघमारे रा. बेलापुरी ता.बीड असे या चालकाचे नाव असून परवाना नसतानाही त्याने अवैधरित्या पाच ब्रास वाळू घेऊन जात असताना त्याला पकडण्यात आले . गेवराई पोलीस ठाण्यात हा हायवा जमा करण्यात आला. या संदर्भात वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांनी तहसीलदारांनाही कळून दंडात्मक कारवाईसाठी प्रस्तावित केले आहे .आता तहसीलदार या हायवावर काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मोकाट जनावराचा बंदोबस्त करा नसता जनावरे नगरपालिकेत कोंडू



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरामध्ये मोकाट जनावरांचा सुसाट वावर आहे यावरती कसलाही नगर प्रशासनाचे अंकुश नाही हे जनावरे कोणाचे आहेत हे देखील माहित नाही पण दिवस रात्र मोकाट जनावरे रस्त्यावर मधोमध बसतात पहिले शहरात रस्त्यांची दुरवस्था असताना याकडे प्रशासनाचे लक्ष नाही रस्त्याच्या कडेने सर्वत्र घाणीचे साम्राज्य यामुळे लोकांना होत असलेला त्रास याकडे प्रशासन व नगर प्रशासन कसलेही लक्ष देत नाही जर येणाऱ्या आठ दिवसांमध्ये नगर प्रशासनाने या मोकाट जनावरांचा स्वच्छतेचा वेली वाट लावली नाही तर आम आदमी पार्टी शहरातील सर्व मोकाट जनावरे नगरपालिकेत आणून कोंडणार याची सर्व जबाबदारी ही प्रशासनाची ◀◀ पान ३ वर

# खुल्या प्रवर्गाच्या घरकुलासाठी महिला अक्रमक; ग्रामपंचायतीला दिले निवेदन



**माजलगाव । प्रतिनिधी**

मानवाच्या मुलभुत गरजा अन्न,वस्त्र, निवारा असून त्यापैकी निवाराही मानवाची अत्यंत आवश्यक गरज आहे.सामान्य नागरिकांचे स्वत:चे घर असल्यास त्यांना सामाजिक सुरक्षितता लाभून समाजामध्ये दर्जा प्राप्त होतो ज्या व्यक्तींना घर नाही अशा व्यक्तींना निवारा मिळण्यासाठी केंद्र शासनाने सन १९८५-८६ पासुन घरकुल योजना सुरु केली असुन एप्रिल १९८९ पासुन ही योजना जवाहर रोजगार योजनेची उपयोजना म्हणून सुरु झाली. १ जानेवारी,१९९६ पासुन ती एक स्वतंत्र इंदिरा आवास योजना म्हणुन सुरु करण्यात आलेली आहे. इंदिरा आवास योजनेचे नामकरण सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापासून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण असे झालेले आहे.प्राधान्यक्षेत्र लाभार्थींची यादी करतांना ग्रामसभेने घरात कोणीही कमवत नाही अशा विधवा,परितक्त्या महिला,कुटूंब प्रमुख,पूरग्रस्त क्षेत्रामधील लाभार्थी अथवा पिडीत लाभार्थी, जातीय दंगलीमुळे घराचे नुकसान (आग व इतर तोडफोड) झालेली व्यक्ती,नैसर्गिक आपत्तीबाधीत व्यक्ती,दिव्यांग व्यक्ती उद्दिष्टाच्या किमान ५ टक्के उद्दिष्ट दिव्यांगाकरीता राखीव ठेवणे आवयश्क आहे. इतर पात्र कुटुंबे यांना ग्रामसभेने प्राधान्य क्षेत्र देण्यात येणार आहे. घराच्या बांधकामाच्या प्रगतीनुसार ◀◀ पान ३ वर

# ओबीसी समाज प्रस्थापितांच्या दावणीला बांधण्याचे काम सुरू

## मयुरीताई खेडकर-मस्के व बाळासाहेब मस्के यांचा पत्रकार परिषदेत गंभीर आरोप

गेवराई । प्रतिनिधी

सध्या गेवराई मतदारसंघात ओबीसी आरक्षण बचाव पदयात्रा सुरु आहे. मात्र या पदयात्रेत तालुक्यातील काही दोन चार स्वयंघोषित ओबीसी नेते मनमानी कारभार करत आहेत. समाजासाठी झोकून देऊन काम करणाऱ्यांना स्वतःच्या स्वार्थासाठी षडयंत्र रचून ओबीसी बचाव पदयात्रेतून डावलले जात आहे. तसेच गेवराई मतदारसंघातील ओबीसी समाज हा तालुक्यातील प्रस्थापितांच्या दावणीला बांधण्याचे काम या मंडळीकडून सुरु असल्याचा गंभीर आरोप गेवराई तालुका ओबीसी




आरक्षण बचाव समितीच्या सदस्या मयुरीताई खेडकर-मस्के व बाळासाहेब मस्के यांनी केला. दरम्यान त्यांनी आम्हाला पदयात्रेत सहभागी होण्यास मज्जाव केला आहे, तसेच आम्हाला जाणीवपूर्वक डावलले जात असल्याने यापुढे आम्ही पदयात्रेत सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे समाजाने आम्हाला माफ करावे, मात्र समाजासाठी कोणाच्या सांगण्यावरून व कोणी दडपण टाकले म्हणून न डगमगता, न थांबता तळागाळातील ओबीसी समाजापर्यंत जाऊन त्यांच्यासाठी अहोरात्र काम करत लढत राहणार असा विश्वास त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

गेवराई येथे आयोजित पत्रकार परिषदेत मयुरीताई खेडकर-मस्के व बाळासाहेब मस्के यांनी शुक्रवार दि.२३ रोजी पत्रकारांशी ◀◀ पान ३ वर

### ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांची भेट घेणार – मयुरी खेडकर

**गेवराई तालुक्यात ओबीसी आरक्षण बचाव पदयात्रेतून समाजासाठी निष्ठेने काम करणाऱ्यांना डावलले जात आहे. तसेच मतदारसंघातील ओबीसी समाज हा प्रस्थापितांच्या दावणीला बांधण्याचे षडयंत्र कशाप्रकारे रचले जात आहे, याबाबत ओबीसी नेते तथा आंदोलक लक्ष्मण हाके यांची भेट घेऊन त्यांच्या कानावर हा विषय आपण घालणार आहोत असे मयुरी बाळासाहेब मस्के -खेडकर यांनी सांगतानाच शनिवार दि.२४ ऑगस्ट रोजी ताडसोन्ना याठिकाणी ओबीसी नेते लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्या ओबीसी आरक्षण बचाव सभेला हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मस्के यांनी यावेळी केले.**

# जय हिंद ग्रुपच्या वतीने सद्भावनादिनी वृक्षारोपण

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

जय हिंद ग्रुपच्या वतीने सद्भावना दिनानिमित्ताने विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले यावेळी मेजर एस पी कुलकर्णी,भागवत मस्ने, दत्ता बनसोडे, रविंद्र मठपती,सायली संस्कार केंद्राच्या संचालिका अपर्णा कुलकर्णी आदी उपस्थित होते.

मेजर कुलकर्णी म्हणाले की, तरुणांनी वृक्ष लागवड करून वृक्षा पोटी सद्भाव जागृत करावा. मानवाचे शरीरच वृक्षावर अवलंबून आहे शुद्ध हवा व ऑक्सिजनची मानवाला गरज आहे. ती गरज वृक्ष भागवतो म्हणून वृक्ष लागवड करून वृक्षाप्रती सद्भावना जागृत करावी असे आवाहन मेजर एस पी कुलकर्णी यांनी केले. आज वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होत आहे ती थांबवून वृक्षाचे संगोपन करणे गरजेचे आहे मस्ने यांनी कविताच्या माध्यमातून मनामनात तरुणांनी वृक्षारोपणाचा विचार करावा. असे सांगितले. सुरज राठोड, सुंदर मुंडे, राहुल नाईकवाडे, वैभव दवंडे, अभिषेक तिडके, समाधान



साठे, अविनाश मळेकर यांनी खड्डे खोदून वृक्षारोपण उपक्रमात सहभाग घेतला. सायली संस्कार केंद्रातील विद्यार्थ्यांनी तुळशीच्या बियांचे रोपण कुंडीत केले व आम्हीही वृक्षाची जपणूक करू असा संकल्प केला. राष्ट्रीय छात्रसेनेच्या कॅप्टन साधना चामले यांच्या मार्गदर्शनाखाली मुलींनी वृक्षाला राखी बांधून वृक्षाप्रती सद्भावना जागवण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रविंद्र मठपती,संचालन दत्ता बनसोडे तर आभार रवींद्र जोशी यांनी मानले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# महायुती सरकारच्या माध्यमातून कोणत्याही समाजावर अन्याय होऊ देणार नाही-अजित पवार

**इंदापूर । प्रतिनिधी**

काम करून जर कोण टीका करीत असेल तर मनाला वेदना होतात. अशी भावनिक साद घालत महायुती सरकारच्या माध्यमातून कोणत्याही समाजावर अन्याय होऊ देणार नाही अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देत आतापर्यंत इंदापूर तालुक्यात आमदारांच्या जितक्या टर्म झाल्या त्यामध्ये तालुक्याच्या विकासासाठी सर्वाधिक ५ हजार ४९५ कोटी रुपयाचा निधी आमदार दत्तात्रय भरणे यांनी २०१९ ते २४ या पाच वर्षाच्या काळात इंदापूरच्या विकासासाठी आणल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.




राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित सन्मान यात्रेचे इंदापूर येथे शुक्रवार (ता. २३) रोजी आगमन झाले. यावेळी आयोजित सभेमध्ये अजित पवार बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, इंदापूर तालुक्याचे आमदार दत्तात्रय भरणे, करमाळ्याचे आमदार संजय शिंदे, रूपाली चाकणकर, पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष प्रदीप गारटकर यांचेसह अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले, सभेला गेल्यावर मी कुणावर टीका टिपणी करत नाही.आम्ही योजना चांगल्या दिल्या आहेत. आजपर्यंत इंदापूर मध्ये सगळ्यात जास्त निधी २०१९ ते २०२४ दरम्यान आला आहे. राज्यातील सव्वा कोटी महिलांच्या खात्यात ३ हजार रुपये जमा झाले आहेत. सोमे गोमे म्हणतात ना जमा झालेले पैसे काढुन घेऊ अरे काय काढून घेऊ तुझ्या घरचे पैसे आहेत का? असा टोला अजित पवार यांनी योजनेला विरोध करणाऱ्यांना लगावला. बहिणीचे झाले भावांसाठी शेतात तीन, पाच व साडेसात एच.पी. शेती वीज पंपांना वीज मोफत दिली आहे. तर थकीत वीज बिलासाठी महायुती सरकारला पुन्हा सत्ता द्या, त्यासाठी नवीन योजना सुरू करतो. विरोधक संविधान बदलण्याची टीका करत आहेत, त्यांच्याकडे कोणतेही मुद्दे नसल्याने ते संविधान बदल बाबत बोलतात. मात्र, जोपर्यंत सूर्य चंद्र आहेत तोपर्यंत संविधान बदलणार नाही. तर काँग्रेस राजवटीतही अल्पसंख्याक समाजाला जितका निधी दिला नाही, त्यापेक्षा अधिक निधी महायुती सरकारने दिला आहे. कांद्याचे दर एवढं कमी झाले की कांद्याने आमचा वांदा केला अशीही कबुली पवार यांनी दिली. यावेळी प्रास्ताविकामध्ये आमदार दत्तात्रय भरणे यांनी इंदापूर तालुक्यामध्ये अजित पवार यांच्या माध्यमातून आणलेल्या कोट्यावधी रुपयांच्या निधीची माहिती देत आगामी काळात तालुक्यासाठी महत्त्वाचा असलेला पाणीप्रश्न सोडवण्याची सोडवण्यासाठी अजित पवार पुढाकार घेण्याची मागणी केली

## रेकॉर्डवरील गुन्हेगाराचा खून; सिंहगड रस्ता परिसरातील घटना

**पुणे । प्रतिनिधी**

बारमध्ये बिलावरून झालेल्या वादातून रेकॉर्डवरील गुन्हेगाराचा खून करण्यात आला आहे. गोट्या उर्फ अमोल शेजवाळ (३४, रा. धायरी फाटा, सिंहगड रस्ता, पुणे) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

ही घटना सिंहगड रस्ता परिसरातील वीर बाजी पासलकर (वडगाव) पुलाजवळील क्लासिक बारसमोर रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले असून गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वडगाव पुलाजवळ असलेल्या क्लासिक बारमध्ये रेकॉर्डवरील गुन्हेगार गोट्या शेजवाळ व त्याचे मित्र दारू पिण्याकरिता बसले होते. दरम्यान रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास बिलावरून बारचालकात व गोट्या शेजवाळ यांच्यात वाद सुरू झाला. तो बार बाहेर जाऊ लागल्याने तेथील बाऊन्सरने त्याला हॉटेलबाहेर अडविले. त्यातून त्याचे बाऊन्सरबरोबर वाद सुरू झाले. यात वाद इतके टोकाला गेले की, वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. बार लगत असलेल्या टायर पंक्चर दुकानातील हातोडी आणून बाऊन्सरने त्याच्या डोक्यात मारले. यात त्याचा जागीच मृत्यू झाला

## दोन लाख सदनिकाधारकांनी ४० टक्क्यांची सवलत गमावली

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महापालिकेने ४० टक्के सवलत देण्यासाठी साडे चार लाख घरांमध्ये जाऊन सर्वेक्षण केले. त्यापैकी २ लाख १६ हजार घरांमध्ये भाडेकरू आढळून आल्याने या सदनिकामालकाची ४० टक्के सवलत गेली असून, त्यांना १०० टक्के कर लावला जाणार आहे. तर २ लाख २९ हजार ३७९ मिळकतींमध्ये स्वतः मालक राहत असल्याचे स्पष्ट झाल्याने या नागरिकांना ४० टक्क सवलत देण्यात येणार आहे.




महापालिकेतर्फे १९७० पासून निवासी मिळकतींना सर्वसाधारण करात ४० टक्के सवलत दिली जात होती. ही सवलत २०१८ पासून रद्द करण्यात आली. २०१९ पासून नव्या घरांना १०० टक्के कर लावण्यात आला. तसेच जीआयएस मॅपिंग सर्व्हेक्षण करून भाडेतत्वावर देण्यात आल्याचे आढळलेल्या मिळकतींचीही ४० टक्क्यांची सवलत काढून घेण्यात आली.

पण हे सर्वेक्षण चुकीच्या पद्धतीने झाल्याने ज्यांची एकच सदनिका आहे व ते स्वतः घरात राहत असतानाही ४० टक्के सवलत काढून घेतली. पुणेकरांनी याविरोधात टीकेचे झोड उठवली. राज्य सरकारने ही सवलत रद्दचा निर्णय घेतला. त्यानंतर पीटी ३ अर्जासाठी घेण्यास सुरुवात करण्यात आली. पण या मोहिमेत अनेक अडथळे आल्याने बहुतांश जणांना पीटी ३ अर्ज भरता आले नाहीत. त्यानंतर महापालिकेने स्वतःहून पुढाकार घेत सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला होता. महापालिकेतर्फे स्वतःची कर्मचारी यंत्रणा वापरून २० जून ते १५ ऑगस्ट या कालावधीत प्रत्यक्ष जागेवर जाऊन सर्वेक्षण केले होते.

या सर्व्हेक्षणासाठी महापालिकेच्या अतिक्रमण विभागाचे ७५ अतिक्रमण निरीक्षक, विविध विभागाचे ७५ लिपिक टंकलेखक या प्रकारे अतिरिक्त १५० सेवकांची नियुक्ती केली होती. या मोहिमेत ४ लाख ५० हजार १३५ मिळकतींचे सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये त्यामध्ये २ लाख २९ हजार ३७९ मिळकतींमध्ये मालक राहत आहेत. २ लाख १६ हजार ५०६ मिळकतींमध्ये भाडेकरू राहत आहेत, अशी माहिती मिळकत कर विभागाचे उपायुक्त माधव जगताप यांनी सांगितले.

## मध्यवर्ती भागात वाहतूक कोंडी

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे २५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या परीक्षेमध्ये कृषी विभागाच्या २५८ पदांचा समावेश करण्याच्या मागणीसाठी स्पर्धा परीक्षाची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी मंगळवारी रात्रीपासून पुण्यातील शास्त्री रोड येथे आंदोलन सुरू केले होते.

त्यामुळे आज तिसऱ्या दिवशी शहरातील मध्यवर्ती भागात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. त्यातच दुपारनंतर मोठ्या प्रमाणात पाऊस सुरु झाल्याने वाहनचालकांचे चांगलेच हाल झाले. विद्यार्थी शास्त्री रस्त्यावर आंदोलन करण्यास बसले होते. त्यांनी एका बाजूने शास्त्री रस्ता आडवून ठेवल्याने मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मात्र, मुख्य शास्त्री रस्ता एका बाजूने अडवल्याने आजूबाजूचे गल्ली बोळ जाम झाले होते. ऐन कार्यालयीन वेळेत रस्ता अडवल्याने परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. यातच गल्ली- बोळांमध्ये गणेशोत्सवासाठी मांडव टाकण्याचे काम सुरू आहे. मांडवासाठी ट्रक, टेम्पो भरून बांबू व इतर साहित्य आणून काम सुरू आहे. त्यामुळेही नागरिकांना रस्ता मिळत नव्हता. याचा परिणाम सदाशिव पेठ, शास्त्री रस्ता आणि टिळक रस्त्यांवर झाला होता. वाहतूक पोलिसांची वाहतूक सुरळीत करताना मोठी दमछाक होताना दिसत होती. दरम्यान, पोलिसांनी संयम सुटल्यावर सायंकाळी पाचच्या सुमारास आंदोलक विद्यार्थ्यांना बळाचा वापर करून विश्रामबाग पोलीस ठाण्यात नेले.

## पत्नीचा ओढणीने गळा आवळून खून; शिक्षक पतीस बेड्या

**पुणे । प्रतिनिधी**

ओढणीने गळा आवळून पत्नीचा (घहशव) खून करून पत्नीने स्वतःच आत्महत्या केल्याचा बनाव करणाऱ्या शिक्षकाला खेड पोलिसांनी अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या पतीला खेड न्यायालयाने पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. सिमा अदिनाथ कुटे (वय ३५, रा.पडाळवाडी, राजगुरुनगर, ता खेड ) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. आरोपी आदिनाथ सुखदेव कुटे (वय ४० रा. पडाळवाडी ता खेड, मुळ रा. अहमदनगर ) असे आरोपी शिक्षक असलेल्या पतीचे नाव आहे.



राजगुरुनगर शहरालगत पडाळवाडी (ता खेड ) येथे सदरची घटना घडली. पती सुखदेव कुटे याला दारू पिण्याचे व्यसन होते. तो सकाळीच दारू पिण्यासाठी बाहेर गेला होता. ९ वाजता घरी आल्यानंतर पत्नी सिमा हिने कुठे गेला होता. असा जाब विचारला म्हणून दोघांमध्ये भांडण झाले.

दारूच्या नशेत आदिनाथ कुटे यांने पत्नी सिमा हिचा ओढणीने गळा दाबून खून केला.घरातील बेडचा दरवाज्याची आतील कडी चतुराईने बंद करून घेतली. मित्र व नातेवाईकांना फोन करून पत्नी सीमा दरवाजा उघडत नाही तुम्ही ताबडतोब या असा बनाव केला. स्थानिक नागरिकांनी दरवाजा तोडून सीमाचा मृतदेह बाहेर काढला. शवविच्छेदन अहवाल समोर आल्यानंतर पोलिसांनी (घहशव) आरोपीला पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर आरोपीनी गुन्ह्याची कबुली दिली. या घटनेचा पुढील तपास खेड पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस उपनिरीक्षक स्नेहल गुरव करत आहे.

## वाढदिवसाचे साहित्य खरेदी करून जातानाच झाला गणेशचा खून

**बारामती । प्रतिनिधी**

बारामतीत बुधवारी (दि. २१) रात्री गँगवॉरने पुन्हा डोके वर काढले. यापूर्वी खून, खुनाचा प्रयत्न असे गंभीर गुन्हे दाखल असलेल्या गणेश धुळाबापू वाघमोडे (वय १७, रा. जळोची, बारामती) याचा बुधवारी रात्री खून झाला. याप्रकरणी शहर पोलिसांनी सहा जणांविरोधात गुन्हा दाखल केला. यामुळे शहर व परिसरात गँगवॉर पुन्हा सक्रिय झाल्याचे दिसून आले असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.




याप्रकरणी मयत गणेश याचे मामा नवनाथ उत्तम चोरमले (रा. अहिल्यादेवी चौक जळोची, बारामती) यांनी फिर्याद दिली. त्यानुसार जयेश बाळासाहेब माने, शुभम गायकवाड, करण जाधव, अविष गरुड, सोमनाथ जाधव व भोल्या (पूर्ण नाव, पत्ते नाहीत) या सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.बुधवारी (दि. २१) सायंकाळी जळोची येथील काळ्या ओढ्याच्या पुलाजवळ ही घटना घडली. गणेश वाघमोडे व आरोपींची गतवर्षी टी. सी. कॉलेजजवळ भांडणे झाली होती. त्या रागातून इनोव्हा गाडीतून आलेल्या या सहा जणांनी फिर्यादीचा भाचा गणेश वाघमोडे याला धारदार शस्त्राने डोक्यात, मानेवर व इतरत्र वार करून त्याचा खून केला. दरम्यान आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत. उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, पोलिस निरीक्षक संतोष घोळवे यांनी घटनास्थळी भेट दिली. दोन वर्षांपूर्वी १८ ऑगस्ट रोजी गणेश वाघमोडे व त्याच्या अन्य सहकार्यांनी बारामतीत शशिकांत बाबासो कारंडे यांचा खून केला होता. कारंडे यांचा मुलगा व इतर अल्पवयीनांमध्ये एका मैत्रिणीशी बोलण्यावरून वाद झाला होता. त्या वादात शशिकांत यांनी मध्यस्थी करत या तरुणांची समजूत घालत त्यांना वडिलकीच्या नात्याने समजावले होते. त्याचा राग मनात धरत परिसरात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने तिघा अल्पवयीनांनी कारंडे यांचा धारदार शस्त्राने निर्घृण खून केला होता. त्यानंतर आता बरोबर दोन वर्षांनी गणेश याचा खून झाला . अल्पवयीन असलेल्या गणेश वाघमोडे याच्यावर बारामतीत यापूर्वी गंभीर गुन्हे दाखल आहेत. २०२२ मध्ये त्याच्यावर खुनाचा, २०२३ मध्ये खुनाच्या प्रयत्नासह शस्त्र अधिनियम तसेच शस्त्रांसह जमाव जमवून मारहाण, गंभीर मारहाण असे चार गुन्हे त्याच्यावर यापूर्वी दाखल आहेत.

सज्ञान होण्यासाठी केवळ एक महिना शिल्लक

स्वतःच्या वाढदिवसासाठी साहित्य खरेदी करून गणेश हा बुधवारी घरी निघाला होता. या वेळी त्याच्यावर हल्ला करत त्याचा खून करण्यात आला. तो सज्ञान होण्यासाठी अवघ्या एक महिन्याचा कालावधी आता उरलेला होता.

# ‘माझी वाघोली माझा अभिमान!’

## वाघोलीच्या समस्या वेधणारा ’रन फॉर वाघोली’ अभिनव उपक्रम

**वाघोली । प्रतिनिधी**

‘माझी वाघोली माझा अभिमान..’ हा संकल्प बाळगून वाघोलीच्या विविध समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी शिरूर हवेलीचे आमदार अशोक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ‘राव लक्ष्मी फाउंडेशन आयोजित रन फॉर वाघोली’ मध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद वाढत असून २५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या या उपक्रमात वाघोलीतील अनेक नागरिक सहभागी होणार असल्याने वाघोलीतील विविध समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा हा एक प्रयोग आहे.




वाघोली मधील पिण्याचे पाणी, सांडपाणी, अंतर्गत रस्ते, क्रीडांगणे वाहतूक कोंडी, लहान थोर सर्वांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी पुणे मनपा प्रशासन व महाराष्ट्र शासन यांचे लक्ष वेधण्यासाठी रन फॉर वाघोली हा उपक्रम आयोजित करण्यात आला असून या उपक्रमात धाराशिव चे खासदार ओमराजे निंबाळकर धावणार असून या माध्यमातून वाघोली करांच्या प्रश्नाला शिरूर हवेलीचे आमदार अशोक पवार यांच्या माध्यमातून वाचा फोडली जाणार असून नागरिक या मोहिमेत जास्तीत जास्त सहभागी होऊ लागले असून या मोहिमेची चर्चा वाघोलीत मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

पुणे महानगरपालिका प्रशासन महाराष्ट्र शासन व महाराष्ट्राच्या विधानसभा पटलावर अनेक वेळा लक्षवेधी मांडून वाघोलीकरांसाठी आणि वाघोलीकर यांचे प्रश्न सोडवण्यासाठी शिरूर हवेलीचे आमदार अशोक पवार यांनी प्रयत्न केल्याने रन फॉर वाघोली हा उपक्रम वाघोलीकरांची बाजू पुणे महानगरपालिकेकडे पोहोचवण्यासाठी उपयुक्त असल्याचे माजी उपसरपंच राजेंद्र सातव पाटील यांनी सांगितले आहे. या उपक्रमात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होऊन वाघोलीकर यांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन आमदार अशोक पवार यांनी केले आहे.

## नयना पुजारी खून खटल्यात अद्यापही कुटुंबीय न्यायाच्या प्रतीक्षेत

**पुणे । प्रतिनिधी**

नयना पुजारी लैंगिक अत्याचार खून खटल्यात कुटुंबीय १५ वर्षांनंतरही फास्ट ट्रॅक न्यायाच्या प्रतीक्षेत आहे. आरोपींना फाशी होण्यासाठी अद्याप न्यायासाठी झगडावे लागत आहे, अशी खंत नयनाचे पती अभिजित पुजारी यांनी व्यक्त करीत लवकर न्याय मिळावा, अशी मागणी केली आहे.




सॉफ्टवेअर कंपनीत काम करणाऱ्या नयना पुजारी या महिलेचे सहा ऑक्टोबर २००९ रोजी कॅबचालकांनी मिळून अपहरण केले होते. त्यानंतर नराधम आरोपींनी नयनावर सामूहिक लैंगिक अत्याचार करून तिचा खून केला होता. तिचा मृतदेह दोन दिवसांनी छिन्न विछिन्न अवस्थेत आढळून आला होता. या घटनेने पुण्यासह संपूर्ण राज्य हादरून गेले होते. तत्कालीन सरकारने हा खटला जलदगती न्यायालयात चालविण्यात येईल असे सांगितले. त्यानुसार विशेष न्यायालयाची नेमणूक करण्यात आली. आरोपींना शिक्षा होण्यासाठी कुटुंबीयांना नऊ वर्षे वाट पहावी लागली होती. न्यायालयाने आरोपींना फाशीची शिक्षा सुनावली होती. मात्र त्यानंतर आरोपींनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. ‘या खटल्याचा निकाल लवकर देऊन आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी, यासाठी प्रयत्न करीत आहोत. परंतु निराशेशिवाय हाती काही लागलेले नाही,’ अशी खंत अभिजित पुजारी यांनी व्यक्त केली.

## पुणे महापालिकेत भाजपाच्या माजी नगरसेविकेकडून माहिती अधिकार कार्यकर्त्याला चपलेने चोप

**पुणे । प्रतिनिधी**

माहिती अधिकार कार्यकर्ता असल्याची बतावणी करून विकासकामामध्ये विनाकारण अडथळा आणत असल्याचा आरोप करून भाजपच्या माजी नगरसेविकेने गुरुवारी या कार्यकर्त्याला चपलेने चोप दिला. या घटनेने खळबळ उडाली. संबंधित व्यक्ती ही शहर काँग्रेसच्या बड्या नेत्याच्या जवळची असल्याची चर्चा आहे.

पुणे महापालिकेच्या माध्यमातून बाणेर भागात आदिवासी मुलींच्या वसतिगृहाचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण व्हावा, यासाठी भाजपच्या माजी नगरसेविका विशेष प्रयत्नशील आहेत. गेल्या काही वर्षांपासून त्या




या प्रकल्पासाठी पाठपुरावा करत आहेत. वसतिगृहाचे बहुतांश काम पूर्ण झाले असून, अंतर्गत काम बाकी आहे.

वसतिगृहाच्या शेवटच्या टप्प्यातील दोन कोटी रुपयांच्या कामाचे आदेश पालिकेने दिलेले नाहीत. हे कामाचे आदेश लवकर द्यावेत, यासाठी संबंधित माजी नगरसेविका महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडे गेल्या होत्या. तेथे अधिकाऱ्याशी बोलत असतानाच माहिती अधिकार कार्यकर्ता म्हणविणारी ही व्यक्ती तेथे आली. त्या वेळी नगरसेविका आणि त्याची शाब्दिक चकमक उडाली. त्यानंतर चिडलेल्या नगरसेविकेने थेट या कार्यकर्त्याला चपलेनेच चोप दिला. अचानकपणे घडलेल्या या प्रकारामुळे काही काळ महापालिकेच्या भवन विभागामध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

## बंद घराचे कुलूप तोडून सहा लाखांची घरफोडी

**पुणे । प्रतिनिधी**

दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्यांनी ५ लाख ९० हजारांचा ऐवज चोरून नेला. ही घटना गुरुवारी (दि. २२) सकाळी उघडकीस आली.

भाऊसाहेब गणपत चांदगुडे (वय ४२, रा. साई मंदिरासमोर, नेहरूनगर, पिंपरी) यांनी गुरुवारी (दि. २२) याबाबत पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फियादी चांदगुडे यांच घर १६ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट दरम्यान कुलूप लावून बंद होते. त्यादरम्यान अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांच्या दरवाजाचे कुलूप तोडून आतील नऊ तोळे ११२ ग्रॅम वजनाचे ५ लाख ९० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. पिंपरी पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

## वाहन चोरी करणाऱ्या दोघांना हिंजवडी पोलिसांकडून अटक

**पुणे । प्रतिनिधी**

वाहन चोरी करणाऱ्या दोन सराईत चोरट्यांना हिंजवडी पोलिसांनी अटक केली. हे चोरटे लक्ष्मी चौक, हिंजवडी येथे चोरीची दुचाकी घेऊन आले असता पोलिसांनी त्यांना सापळा लावून ताब्यात घेतले. ती कारवाई बुधवारी (दि. २१) करण्यात आली.

अक्षय बाबूलाल राकावत (वय २८), मदनलाल छोटूराम देवासी (दोघे रा. जांबे, ता, मुळशी. मूळ रा. राजस्थान) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.



पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुळशी तालुक्यातील जांबे गावात भारत सोपान जाधव (वय ५३, रा. वाकड) यांनी त्यांची २० हजार रुपये किमतीची दुचाकी (एमएच १४/एचएफ ५९०९) पार्क केली होती. भर दिवसा त्यांची दुचाकी चोरीला गेल्याचा प्रकार १९ ऑगस्ट रोजी उघडकीस आला होता. या गुन्ह्याचा तपास करत असताना हिंजवडी पोलिसांना माहिती मिळाली की, लक्ष्मी चौक हिंजवडी येथे दोघेजण चोरीची दुचाकी घेऊन येणार आहेत. त्यानुसार पोलिसांनी सापळा लावून अक्षय आणि मदनलाल या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे असलेल्या दुचाकीबाबत चौकशी केली असता ती दुचाकी त्यांनी जांबे गावातून चोरी केल्याचे सांगितले. त्यांच्याकडे आणखी चौकशी करत पोलिसांनी चार दुचाकी आणि एक रिक्षा जप्त केली. या कारवाईमुळे हिंजवडी आणि वाकड पोलीस ठाण्यातील प्रत्येकी दोन, हडपसर आणि पौड पोलीस ठाण्यातील प्रत्येकी एक वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त विनायक कुमार चौबे, सह पोलीस (कळपक्षुरवळ) आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त विशाल गायकवाड, सहायक पोलीस आयुक्त सुनील कुऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक कन्हैया थोरात, पोलीस निरीक्षक ऋषिकेश घाडगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक राम गोमारे, पोलीस उपनिरीक्षक बंडू मारणे, पोलीस अंमलदार बाळकृष्ण शिंदे, नरेश बलसाने, बापूसाहेब धुमाळ, योगेश शिंदे, कैलास केंगले, कुणाल शिंदे, विक्रम कुदळ, अरुण नरळे, रितेश कोळी, श्रीकांत चव्हाण, कारभारी पालवे, दत्ता शिंदे, ओमप्रकाश कांबळे, मंगेश लोखंडे यांनी केली.

## रूपाली चाकणकरांची हकालपट्टी करा

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या आणि बाल लैंगिक अत्याचाराच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर अत्यंत निषेधार्ह आणि बेताल वक्तव्य केल्याप्रकरणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदावरून रूपाली चाकणकर यांची हकालपट्टी करावी, अशी मागणी पुणे शहरातील कार्यरत असलेल्या महिला संघटनांच्या प्रतिनिधींकडून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली. शिष्टमंडळाकडून हे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांना देण्यात आले.

बदलापूर, लातूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर आदी शहरांत झालेल्या महिला आणि बाललैंगिक अत्याचाराच्या घटनांच्या अनुषंगाने अत्यंत संताप व्यक्त केला जात आहे.



अशा वेळी पीडित कुटुंबीयांना आधार देत त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याऐवजी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा चाकणकर यांनी मात्र पीडित कुटुंबियांनीच मुलींकडे लक्ष द्यावे, अशी वक्तव्य केलेली आहेत.

ही बाब अत्यंत धक्कादायक आणि निंदाजनक असल्याने चाकणकर यांच्यावर कारवाई करावी, अशी अपेक्षा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. राज्याच्या मुख्य सचिवपदी, तसेच राज्याच्या पोलीस महासंचालक पदावर महिला अधिकारी कार्यरत असताना या घटनांकडे प्रशासकीय अधिकारी दुर्लक्ष करत आहेत, हे अशोभनीय आहे.

मुख्य सचिव आणि महासंचालकांनी राज्यातील महिला अत्याचाराच्या प्रश्नावर ठोस भूमिका घेत, याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांचे निलंबन आणि गुन्हे दाखल करण्याची कारवाई करावी, याबाबतची श्वेतपत्रिका तात्काळ जाहीर करावी, अशीही मागणी या वेळी करण्यात आली. विरोधी पक्षांकडून २४ ऑगस्ट रोजी पुकारलेल्या महाराष्ट्र बंदमध्ये सहभागी होऊ, असे या वेळी महिलांनी जाहीर केले. या शिष्टमंडळात रिपब्लिकन युवा मोर्चाच्या सुवर्णा डंबाळे, ड. वैशाली चांदणे आदी उपस्थित होते.